# शेतात पाणी आल्यास आत्महत्या थांबतील

अणदूर । कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंतेचा विषय असून, शेतात मुबलक पाणी आले व त्याची पत्नी कमावती झाली तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील, असे मत लातूर येथील डॉ. विकास कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

येथील जवाहर महाविद्यालयाच्या रासेयो विभागाच्या वतीने महिला, बेरोजगारांसाठी आयोजित लघुउद्योग व स्वयंरोजगार निर्मिती शिबिरात ते बोलत होते. उद्घाटन सरपंच रामचंद्र आलुरे यांच्या हस्ते झाले तर अध्यक्षस्थानी प्राचार्य उमाकांत चनशेट्टी होते. व्यासपीठावर मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, पोलिस प्रशिक्षक अझर शेख, वंदना कुलकर्णी उपस्थित होते. डॉ. कुलर्णी यांनी शेतमालास प्रचंड दराने बाजारपेठ मिळू शकत हे सांगताना त्यांनी तयार केलेल्या अनेक वस्तू दाखवल्या. उद्योजक बनून नोकऱ्या द्या, असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्य चनशेट्टी, सरपंच आलुरे, प्रा. वाहुळे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिता मुदकण्णा, सूत्रसंचालन डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले तर डॉ. आगलावे यांनी आभार मानले. कार्यक्रमास संयोजन समितीचे मान्यवर, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, अगंणवाडी, आशा व बचत गटाच्या कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# लघुउद्योग उभारण्यासाठी एकदिवसीय कार्यशाळा

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन

अणदूर, ता. १५ (बातमीदार) : युवकांनी नोकरीच्या मागे न लागता वेगवेगळे लघुउद्योग उभारून स्वावलंबी व्हावे, यासाठी जवाहर महाविद्यालयात लघुउद्योग व स्वयंरोजगार निर्मिती एकदिवसीय कार्यशाळा बुधवारी (ता.१५) घेण्यात आली.

यावेळी यूपीएससी व एमपीएससी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचेही उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी सरपंच रामचंद्र आलुरे होते. मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वाटाड्या संस्थेचे प्रमुख प्रा. डॉ. विकास कुलकर्णी (लातूर) यांनी युवकांना अनेक लघुउद्योग करून यशस्वी होण्यासंबंधी माहिती दिली. प्रा. विवेकानंद वाहुळे, सरपंच आलुरे, डॉ. चनशेट्टी यांची भाषणे झाली. दरम्यान, विनामूल्य प्रशिक्षण देणारे अझहर शेख यांचा सन्मान करण्यात आला. तर बचत गटाच्या माध्यमातून यशस्वी झालेल्या मीरा घुगे, वैशाली घुगे, मीना पाटील, स्नेहलता सुरवसे, मीना भोरे, शशिकला पाटील आदी महिलांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी स्व. शांताकाकी आलुरे महिला सक्षमीकरण केंद्र व जवाहर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने पुढाकार घेतला होता. प्रा. डॉ. अनिता मुदकण्णा-लंगडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. एम.बी. बिराजदार यांनी सूत्रसंचालन तर प्रा. सूर्यकांत आगलावे यांनी आभार मानले.



अणदूर : सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, एमपीएससी व यूपीएससी मार्गदर्शन केंद्राच्या उद्घाटनाप्रसंगी रामचंद्र आलुरे, विकास कुलकर्णी, प्राचार्य चनशेट्टी, वंदना कुलकर्णी आदी.

लोकमत

# भाकरी देण्यापेक्षा भाकरी निर्माण करण्याचे धडे द्या

## विकास कुलकर्णी यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना मदत करण्यासाठी, त्यांना आधार देण्यासाठी अनेक दातृत्वशील मंडळी पुढे येताना दिसतात. परंतु, ही मदत तात्पुरती व तुटपुंजी आहे. त्यामुळे त्या कुटुंबाला भाकरी देण्यापेक्षा भाकरी कशी निर्माण करायची याचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे, असे मत लातूर येथील डॉ. विकास कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवायोजना विभागाच्या वतीने आयोजित लघुउद्योग व स्वयंरोजगार निर्मिती शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी तर उद्घाटक म्हणून अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, वंदना कुलकर्णी, पोलीस प्रशिक्षक अझर शेख, डॉ. मीना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. कुलकर्णी यांनी विविध बाजारपेठांत किमतीची असणारी तफावत सांगून काही उत्पादनांचे प्रदर्शन दाखविले. या कार्यक्रमात जवाहर पोलीस अकॅडमीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मीराताई घुगे, वैशाली घुगे, नीता पाटील, स्नेहलता सुरवसे, प्रा. इंदुमती भोरे, शशिकला पाटील यांचा उद्योजिका म्हणून सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, सरपंच रामचंद्र आलुरे, प्रा. विवेकानंद बाहुळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. अनिता मुदकन्ना, सूत्रसंचालन डॉ. मल्लीनाथ बिराजदार यांनी केले. आभार डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी मानले. लक्ष्मीबाई आलुरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमासाठी डॉ. सुरेखा भारती, प्रा. माधुरी गडसिंग, डॉ. मानसी स्वामी यांच्यासह प्राध्यापक,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी कार्यकर्ती, उमेदच्या बचतगटाच्या महिला, किशोरी, विद्यार्थी उपस्थित होते.

Hello Osmanabad
Page No. 3 Dec 16, 2021
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# जवाहर महाविद्यालयात करिअर कट्ट्याचे उद्घाटन



**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**अणदुर:** तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील जवाहर महाविद्यालयात उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्ट्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समन्वयक प्रा. विवेकानंद वाहुळे, डॉ. एस. जी. बिराजदार, डॉ. एम. एम. लंगडे, डॉ. अनिता मुदक्कणा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नाशिक येथील साहित्य संमेलनात कवितेचे उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**Smart Osmanabad**
Page No.3 December 11, 2021

पुढारी

# 'जवाहर'मध्ये करिअर कट्ट्याचे उद्घाटन

## अभासी जगात अडकून नुकसान करून घेऊ नका : डॉ.उमाकांत चनशेट्टी

**अणदूर, पुढारी वृत्तसेवा :** तुळजापूर तालुक्यातील अणदूर जवाहर महाविद्यालय येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या वतीने आयोजित युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्ट्याचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी करिअर कट्ट्याचे समन्वयक प्रा. विवेकानंद वाहुळे, प्रा. डॉ एस. जी. बिराजदार प्रा. डॉ. एम. एम. लंगडे, प्रा. डॉ. अनिता मुदक्कणा यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नाशिक येथे संपन्न झालेल्या संमेलनात कविता सादर केलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी विजय जाधव याचा सत्कार करण्यात आला. 'माय बाप' या कवितेचे वाचन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.चनशेट्टी युवकांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, सुखाच्या लालसेपेक्षा सहासाची ओढ ज्याच्यात असते तो खरा तरुण. करिअर कट्ट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जागरूक राहून मर्दुमकी गाजवायची आहे. भारत हा तरुणांचा, युवकांचा देश आहे. सतत मोबाईलमध्ये डोके घालून बसणारे युवक, देशासाठी, स्वतःसाठी धोकादायक आहेत. आभासी जगात पब्जीसारख्या खेळात अडकून स्वतःचे नुकसान करून घेऊ नका. आपला देश जगावर राज्य करेल तो तरुणांच्या बळावर. मोबाईलचा योग्य वापर करून आपले व्यक्तिमत्त्व फुलवा. उच्च शिक्षण घ्या, मोठे अधिकारी बना, करीअर घडवा.असा मोलाचा संदेश दिला. महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.सूत्रसंचालन प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले.



My Latur Edition
Dec 11, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# जवाहर महाविद्यालयात करिअर कट्ट्याचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १० डिसेंबर-**

जवाहर महाविद्यालय अणदूर येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी करियर कट्ट्याचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी करीअर कट्ट्याचे समन्वयक प्रा. विवेकानंद वाहुळे, प्रा. डॉ एस. जी. बिराजदार प्रा. डॉ. एम. एम. लंगडे, प्रा. डॉ. अनिता मुदक्कणा उपस्थित होते.

याप्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नाशिक येथे संपन्न झालेल्या संमेलनात कविता सादर केलेल्या आपल्या उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी विजय जाधव याचा सत्कार करण्यात आला. 'माय बाप' या कवितेचे वाचन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी युवकांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, करिअर कट्ट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जागरूक राहून मर्दुमकी गाजवायची आहे. भारत हा तरुणांचा, युवकांचा देश आहे. सतत मोबाईलमध्ये डोके घालून बसणारे युवक, देशासाठी, स्वतःसाठी धोकादायक आहेत. आभासी जगात पब्जी सारख्या खेळात अडकून स्वतःचे नुकसान करून घेऊ नका. आपला देश जगावर राज्य करेल तो तरुणांच्या बळावर. मोबाईलचा योग्य वापर करून आपले व्यक्तिमत्त्व फुलवा. उच्च शिक्षण घ्या, मोठे अधिकारी बना, करीअर घडवा. सूत्रसंचालन प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले.

लोकमत

शाळा, महाविद्यालयात विविध उपक्रम

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी जिल्हाभरात अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**उस्मानाबाद :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्ह्यात ठिकठिकाणी विविध उपक्रम राबवून अभिवादन करण्यात आले.



**पारगाव ग्रामपंचायत**

पारगाव : येथील ग्रामपंचायत कार्यालयात समाधान मोटे व राजाभाऊ कोळी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामूहिक बुद्धवंदना घेण्यात आली. यावेळी उपसरपंच कॉ. पंकज चव्हाण, जितेंद्र औताने, डी. बी. मोटे, भारत गायकवाड, मनोज औताने, मुकेश औताने, आर. ए. डोके आदी उपस्थित होते.

**जिल्हा परिषद शाळा, गुगळगाव**

बलसूर : उमरगा तालुक्यातील गुगळगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत महापरिनिर्वाण दिनानिमित्त माडज बीटचे विस्तार अधिकारी शिवाजीराव सुरवसे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. चंदकांत कांबळे यांनी बाबासाहेबांविषयी विचार मांडले. यावेळी केंद्रप्रमुख प्रकाश मुळे, मुख्याध्यापक पप्पू मुळे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

**जवाहर महाविद्यालय**

अणदूर : येथील जवाहर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास डॉ. मल्लिनाथ लंगडे, डॉ. एस. व्ही. राजमाने, डॉ. राजशेखर नळगे, डॉ. एम. बी. बिराजदार, डॉ. अनिता मुदकन्ना, डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. मारुती मुसांडे, प्रा. सत्येंद्र राऊत, प्रा. विवेकानंद वाहुळे, डॉ. मीना जाधव, डॉ. एस. एस. बाड, डॉ. जी. टी. राठोड, प्रा. सुरेखा भारती, डॉ. अमोल पाचपिंडे, डॉ. विश्वास माने, काशिनाथ करपे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**मलंग विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा**

उमरगा : येथील शरणप्पा मलंग विद्यालयामध्ये महापरिनिर्वाण दिनानिमित्त सांस्कृतिक विभागाच्या वतीने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक योगदान' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. तत्पूर्वी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अजित गोबारे तर प्रमुख पाहुणे म्हणून कुमारस्वामी प्राथमिक विद्यामंदिराचे उपमुख्याध्यापक सुभाष कलापे उपस्थित होते. सूत्रसंचालन परमेश्वर सुतार यांनी केले तर आभार बालाजी हिप्परगे यांनी मानले. कार्यक्रमासाठी राजकुमार जाधव, अगतराव मुळे, सतीश कटके, परमेश्वर कोळी, प्रभावती बिराजदार, मीनाक्षी हत्ते, कलशेट्टी पाटील, मोहन साखरे, दुष्यंत कांबळे आदींनी पुढाकार घेतला.

**भाऊसाहेब बिराजदार विद्यालय**

बलसूर : उमरगा तालुक्यातील येळी येथील भाऊसाहेब बिराजदार स्मारक विद्यालयात महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक महेंद्र कांबळे यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी उपमुख्याध्यापक अजय कुंभार, बालाजी आंबेकर, राजेंद्र पटवारी, प्रकाश टोपगे, राजेसाहेब मुजावर, उद्धव आकनगिरे, राजेंद्र किरकोळ, मुरली कोळी, पांडुरंग शिंदे आदींची उपस्थिती होती.

**पारगावात सामूहिक बुद्धवंदना**

पारगाव : वाशी तालुक्यातील पारगाव येथील पंचशील नगर भागात डॉ. चंद्रशेखर कोकणे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व सामूहिक बुद्धवंदना म्हणून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपसरपंच कॉ. पंकज चव्हाण, जितेंद्र औताने, डी.बी. मोटे, प्रकाश रणदिवे, समाधान मोटे, भारत गायकवाड, नितीन माने, मनोज औताने, बप्पा शेंडगे, राजाभाऊ कोळी, रतन औताने, मुकेश औताने यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## सालेगावात अस्थी रक्षाचे पूजन करून अभिवादन

- लोहारा : महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६५ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त युगप्रवर्तक चैत्यविहार चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने सालेगाव येथील क्रांती परिसरातील डॉ. आंबेडकर यांच्या अस्थी रक्षाचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तालुक्यातील सालेगाव येथे क्रांती परिसरात महामानव डॉ. आंबेडकर यांचे अस्थी कलश आहे. येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने अस्थी रक्षाचे दर्शन घेण्यासाठी भीमसैनिक मोठ्या संख्येने येतात. यावेळी जि. प. चे समाजकल्याण सभापती हरिष डावरे यांच्या हस्ते अस्थी रक्षाचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.
- यावेळी बाबूराव गायकवाड, सरकार भीमराज ग्रुपचे आनंद कांबळे, सरपंच नारायण गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. अस्थी स्मारक समितीचे संस्थापक अध्यक्ष विजयकुमार भालेराव, अविनाश भालेराव, परमेश्वर भालेराव, अण्णाराव भालेराव, विक्रम भालेराव, संतोष भालेराव, राजानंद भालेराव, आविष्कार भालेराव, भैय्यासाहेब भालेराव यांच्यासह भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल उपस्थित होते.

## २१६५ मेणबत्त्या लावून अभिवादन

- तुळजापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील पुतळ्यास पोलीस निरीक्षक आजिनाथ काशिद यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सागर कदम यांच्या वतीने १६५ शिवभोजन थाळींचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच सायंकाळी २१६५ मेनबत्त्यांचे प्रज्वलन करून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. यावेळी भिमनगर, सिद्धार्थनगर, हाडको, तुळजापूरमधील समाजबांधव उपस्थित होते.



## हाडोंग्री येथे अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**भूम :** तालुक्यातील हाडोंग्री येथे के.डी. फाउंडेशनच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना वही पेनचे वाटप करून महामानवास अभिवादन करण्यात आले.

नालंदा बुद्ध विहार येथे उपविभागीय कार्यालयातील अव्वल कारकून अश्विनकुमार कांबळे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर संघकार लोमटे, अमित लोमटे यांनी उपस्थितांना त्रिशरण पंचशील दिले. यावेळी ग्रामसेवक नीलम जानराव, सरपंच सुधीर क्षीरसागर, सिद्धोधन शिंदे, अशोक वाघमारे, अशोक क्षीरसागर, अर्जुन टेकाळे, गुलाब टेकाळे, नीलेश टेकाळे, गौतम टेकाळे, किरण टेकाळे, अशोक टेकाळे, खंडू टेकाळे, संकेत टेकाळे, आकाश टेकाळे, मयूर काळे, दादा लांडगे, समाधान तळेकर, अमोल भरनाळे, राहुल बनसोडे, पोलीस पाटील सुशील बनसोडे, अनिकेत गडबडे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

त्याचप्रमाणे, जिल्हा परिषद शाळा व भगवंत विद्यालय येथेही अभिवादन करून विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापक सचिन गोवर्धन यांनी पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी शालेय समितीचे अध्यक्ष रवींद्र लोमटे, उपाध्यक्ष काशिनाथ जावळे, नीलेश टेकाळे, किरण टेकाळे, राख, दुधाळ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



भूम तालुक्यातील हाडोंग्री येथे नालंदा बुध्दविहारात अभिवादन करताना अश्विनकुमार कांबळे यांच्यासह अन्य.

Hello Osmanabad
Page No. 4 Dec 08, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# 'निर्धार समानतेचा' नाटिकेद्वारे जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** येथील हॅलो मेडिकल फाउंडेशन, ग्रामपंचायत कार्यालय, जवाहर विद्यालय व कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह, लैंगिक शोषण, महिलांवरील कौटुंबिक व सामाजिक हिंसाचार प्रतिबंध यासाठी जाणीव जागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यात 'निर्धार समानतेचा' या नाटिकेचे सादरीकरण करण्यात आले.

यावेळी सरपंच रामचंद्र आलुरे, सेवानिवृत्त पोलीस आयुक्त सुरेश कंदले, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, मिलिंद चव्हाण, मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, शिक्षण विस्ताराधिकारी तात्याराव माळी, डॉ. अनिता मुदकान्ना, ॲड. प्रसन्नाताई किनवली, स्वतंत्र थेटर ग्रुपचे दिग्दर्शक अभिजित चौधरी, कलात्मक दिग्दर्शिका धनश्री हुबळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या नाटिकेद्वारे बालविवाह, मुलींचे शिक्षण, व्यसनाधीनता, गैरसमजातून कौटुंबिक हिंसा, सामाजिक व मानसिक हिंसा, स्त्री-पुरुष समानता, महिलांचा संपत्तीमध्ये वाटा,हुंडा, कर्ज काढून लग्न नको, समाजातील महिलांचे स्थान याबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी 'बालविवाह करणार नाही, हुंडा घेणार नाही, देणार नाही, हिंसा करणार नाही, समानतेने वागेल' अशी सामुदायिक प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी एकात्मिक बालविकास केंद्रातील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा गटप्रवर्तिका, आशा कार्यकर्ती, शाळा महाविद्यालयांतील प्राध्यापक, शिक्षक, महिला मंडळातील सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमासाठी बसवराज नरे, वासंती मुळे, नागिणी सुरवसे, ॲड. प्रियंका जाधव, अनंत अहंकारी, प्रबोध कांबळे, जावेद शेख, प्रसन्न कंदले, बालाजी जाधव, अनुराधा जाधव, दिनेश गाढवे, मंजुषा करपे यांनी पुढाकार घेतला.

Hello Osmanabad
Page No. 3 Dec 08, 2021
Powered by: erelego.com

# बाभळीच्या शेंगा

▪ मनातलं काही



▪ प्रा.डॉ.अनिता मुदकण्णा

*पालक म्हणून काळजी वाटते ना मुलांची? त्यांच्या तब्येतीची? मग त्यांना रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वेड्या बाभळीसारखं कणखर होऊ द्या. मातीत मिसळू द्या. निसर्गाशी, जुन्या लोकांशी आपल्या गावाशी नाळ जुळू द्या. मग बघा, बाभळीच्या शेंगांचा मंजूळ आवाज त्यांच्या आयुष्यात येतो की नाही...*

अनेक वर्षांनी आज बाभळीची शेंग पाहायला मिळाली. रस्त्याच्या दुतर्फा आपलं पिवळंशार रुपडं घेऊन हसत उभी असलेली... शाळेत असताना तिच्या पिवळ्याधमक छोट्या सुगंधी फुलांचा मनाला मोह पडायचा आणि शाळेत जाणारी पावलं झाडाखाली थबकायची. ती नाजूक फुलं हळुवार दप्तरात ठेवायची आणि उशीर झाला म्हणून धास्तीने पळत सुटायचं. शाळेत जाईपर्यंत प्रार्थना संपलेली असायची. छडीच्या शिक्षेसाठी हात पुढे केला की फुलाने पिवळा झालेला तळहात लाल व्हायचा. तो हळद लागल्याचा भास बालपणाला मोहरून टाकायचा. आम्ही फुलांच्या धुंदीत असायचो. कारण फुलांबरोबर शेंगा वाचायच्या राहून गेल्या हे त्या वेळी डोक्यात असायचं. तास चालू पण मनात छुमछुम वाजणारी शेंग तशीच. मग आम्हा मैत्रिणींचा जेवणाच्या सुट्टीत शेंगा गोळा करायला जायचा बेत ठरायचा. त्याच आनंदात तासिका संपायच्या आणि खेळाच्या तासात गोळा केलेली शेंग समान पद्धतीने तोडायची. दोऱ्याने त्यांना छान गुंफायची आणि पैंजण म्हणून पायांत, हातात, जोडव्यांच्या बोटाला बांधायची. तेव्हापासूनच की काय मनात संसार, नवरा याच वेडं फुलायचं. पिवळ्या फुलांनी कर्णफुलं तयार व्हायची, गळ्यात माळ सजायची, बोटात अंगठी शोभून दिसायची आणि गोजिरवाणं रूप आणखी खुलायचं. पैंजण वाजावी म्हणून पावले दिमाखात टाकायची. किती आनंद त्याचा! आजकालच्या लेकरांसारखं शहाणपण तेव्हा आलेलं नव्हतं कुणाला. आपलं हे असं रूप विक्षिप्त दिसत असेल हे कळायचंदेखील नाही.



काळानुरूप आजकालची लहान मुलं खूप लवकर 'मॅच्युअर' झाली. यात त्या मुलांचा दोष नाही. सामाजिक सरंचना, विभक्त कुटुंब पद्धती, कमावणारे दोन्ही पालक, सोशल मीडिया, इतर साधनांनी त्यांचे बालपण हिरावलंय. जुन्या गोष्टी म्हणजे खेडवळ पद्धत. स्टँडर्ड मेंटेन करायचं हा विचार आपणच त्यांच्या मनात रुजवलाय. कधी कधी छोट्या छोट्या वेड्या गोष्टी करण्याचही आनंद लपलेला असतो हे आपण त्यांना सांगितलंच नाही. हायजीनिकच्या नावाखाली मातीमध्ये खेळू दिलंच नाही. जगण्याची खोटी कल्पना त्यांच्यासमोर उभी केली आणि त्यांना अकाली प्रौढत्व बहाल केलं. व्हिडिओ गेमचा रिमोट त्यांच्या हाती देऊन विटीदांडू, गोट्या, सारीपाट, झिम्मा, फुगडी असे कितीतरी आरोग्यास फायदेशीर खेळ बाजूला केले. आता पायरीवरून पडली तरी मुलांचे हातपाय मोडतात. आमची पिढी कितीदा तरी झाडावरून आपटायची, कितीदा तरी ठेचकाळायची, गुडघे फुटायचे...आता कुठे गेलं ते मजबूत बालपण? मुलांना रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वेड्या बाभळीसारखं कणखर होऊ द्या. मातीत मिसळू द्या. निसर्गाशी, जुन्या लोकांशी, आपल्या गावाशी त्यांची नाळ जुळू द्या. मग बघा, बाभळीच्या शेंगांचा मंजूळ आवाज त्यांच्या आयुष्यात येतो की नाही...

▪ संपर्क : ९९७०९४८८७३

# गुरुजींचे विचार नव्या पिढीला देण्यासाठी स्मारक उभारणार

## माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांची माहिती



तभा वृत्तसेवा,
अणदूर, दि. २९ नोव्हेंबर-

शिक्षण महर्षी सि. ना आलुरे गुरुजी यांनी आपले संपूर्ण जीवन महात्मा गांधी, संत विनोबा भावे व साने गुरुजी यांच्या तत्वावर घालवले. गुरुजींनी आपल्या जीवनात सत्य, अहिंसा व प्रेमाची शिकवण दिली. सर्वधर्म समभावाची शिकवण सर्वामध्ये रुजवली, शिक्षणाची गंगा गरीबाच्या झोपडीपर्यंत नेली, आज हजारो गुरुजींचे विद्यार्थी मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत, हेच विचार पुढील पिढीला देण्यासाठी गुरुजींचे स्मारक उभारण्याचा संकल्प केला आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा स्व.सि ना आलुरे गुरुजी स्मारक समितीचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण यांनी केले.

**असे असेल स्मारक-** आठ हजार चौरस फुटाच्या भागात मध्यभागी पिरॅमिड आकाराच्या चबुतऱ्यावर गुरुजींचा पंधरा फुटी पूर्णाकृती पुतळा,खालील भागात ध्यान मंदिर, बाजूला ग्रंथालय, एक मोठे सभागृह, एक मोकळे सभागृह तर गेट असलेला बगीचा असेल. अणदूर मध्ये येणाऱ्या प्रत्येकाला हे स्मारक प्रेरणा देणारे असेल.

**यांनी जाहीर केला निधी-** स्मारकाच्या उभारणी कामात लक्ष्मीकांत पाटील पाच लाख, आ. ज्ञानराज चौगुले दोन लाख एकावन्न हजार,कै. ब इ चनशेट्टी प्रतिष्ठानच्या एक लाख,सुधाकर हलकुडे ५१ हजार,शंकरराव साखरे ५१ हजार, सुभद्रा मुळे ५१ हजार,डॉ विवेक बिराजदार २५ हजार निधी जाहीर केला.

जवाहर महाविद्यालयात आयोजित स्मारक समिती सभेच्या अध्यक्षस्थावरून चव्हाण बोलत होते. आ. ज्ञानराज चौगुले, जिल्हा परिषद अध्यक्ष अस्मिता कांबळे, माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, सेवानिवृत्त न्यायाधीश ज्ञानेश्वर भरगंडे, नीलकंठ नरे, सेवानिवृत्त समाजकल्याण उपसंचालक एम के कुलकर्णी, माजी सभापती भीमाशंकर जमादार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शिवदास कांबळे, जिल्हा परिषद सदस्य बाबुराव चव्हाण, कारखान्याचे माजी अध्यक्ष सिद्रामप्पा खराडे, महिला कॉंग्रेसच्या अध्यक्ष सुभद्रा मुळे, सरपंच रामचंद्र आलुरे, मुख्याध्यापक सुरेश टोंबरे, महादेवप्पा आलुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी स्मारकाच्या उभारण्यासाठी शासन दरबारी आवश्यक असणारी सर्व प्रक्रिया पूर्ण करून गुरुजींचा विद्यार्थी या नात्याने स्मारकाला सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे व ज्ञान-ज्योती सामाजिक संस्थेच्या वतीने दोन लाख एकावन्न हजार रुपये देणगी जाहीर केली. सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष दीपक आलुरे,उपसरपंच डॉ नागनाथ कुंभार, ग्रामपंचायत सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, बाळकृष्ण घोडके-पाटील, डॉ. विवेक बिराजदार, धनराज मुळे, माणिक आलुरे, काशिनाथ शेटे, बालाजी मोकाशे,बालाजी घुगे, संगमेश्वर जळकोटे,मारुती खोबरे, सिद्धराम धमुरे, दयानंद मुडके यांच्यासह गुरुजींवर प्रेम करणारे विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्राम पंचायत सदस्य, माजी विद्यार्थी, शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व शाखांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, सूत्रसंचालन डॉ. एम बी बिराजदार यांनी तर डॉ. अंकुश कदम यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

# अणदुर येथे माजी आ.आलुरे यांचे स्मारक होणार



**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**अणदुर :** तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथे शनिवारी (दि.२७) शिक्षणमहर्षी माजी आ. सि. ना. आलुरे गुरूजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रेरणास्थळ उभारण्यासाठी सहविचार सभा घेण्यात आली. यावेळी अणदुर येथे माजी आ.आलुरे यांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

कार्यक्रमास कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, जि.प.अध्यक्षा अस्मिता कांबळे,आ. ज्ञानराज चौगुले, नानासाहेब पाटील, महादेव आलुरे, रामचंद्र आलुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सभेचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. यावेळी माजी मंत्री चव्हाण, आ. चौगुले, जि.प. अध्यक्षा कांबळे, जि.प. सदस्य बाबुराव चव्हाण, भिमाशंकर जमादार, नानासाहेब पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. सभेस शिवदास कांबळे, सिद्रामप्पा खराडे, निळकंठ नरे, डॉ. नागनाथ कुंभार, डॉ. जितेंद्र कानडे, बाळकृष्ण घोडके, डॉ.विवेक बिराजदार, बालाजी मोकाशे, धनराज मुळे, माणिक आलुरे, दयानंद आपशेट्टी, ॲड. दिपक आलुरे, विक्रम आलुरे, दयानंद मुडके यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. मल्लिनाथ बिराजदार तर प्रा.अंकुश कदम यांनी आभार मानले.

Smart Osmanabad
Page No.2 November 30, 2021

# सहविचार सभेत आलुरे गुरुजींचे प्रेरणास्थळ उभारण्याच्या निर्धार

**प्रतिनिधी** | अणदूर

शिक्षणमहर्षी, माजी आमदार स्वर्गीय सि. ना. आलुरे गुरुजी यांचे शैक्षणिक, सामाजिक, सहकार व राजकीय क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन त्यांचे विचार व आदर्श भावी पिढीस मार्गदर्शक आहेत. त्यांच्यापासून वैचारिक प्रेरणा मिळावी, यासाठी अणदूर येथे त्यांचे प्रेरणास्थळ, पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा निर्धार येथील सहविचार सभेत करण्यात आला.

यासाठी निधीचा श्रीगणेशाही करण्यात आला. येथील जवाहर विद्यालयात झालेल्या सहविचार सभेच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण होते. महात्मा गांधी, विनोबा भाव व साने गुरुजी यांची विचारसरणी अंगिकारलेल्या आलुरे गुरुजी यांचा तुळजापूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासात सिंहाचा वाटा आहे. समाजहितासाठी त्यांचे योगदान मोठे आहे, अशी भावना मान्यवरांनी व्यक्त करत गुरुजींचे प्रेरणास्थळ साकारत असल्याचे स्पष्ट केले. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अस्मिता कांबळे, नानासाहेब पाटील, माजी जि. प. सदस्य महादेवप्पा आलुरे, सरपंच रामचंद्र आलुरे उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले.

या सभेस जिल्हा परिषद सदस्य बाबुराव चव्हाण, सोलापूरचे माजी सभापती भीमाशंकर जमादार, माजी जि.प. अध्यक्ष शिवदास कांबळे, श्री. तुळजाभवानी सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन सिद्रामप्पा खराडे, निलकंठ नरे गुरूजी, माजी सभापती बालाजी मोकाशे, माजी सरपंच धनराज मुळे, माणिक आलुरे, सिद्धेश्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अँड. दिपक आलुरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षण प्रसारक मंडळ संचालित सर्व शाळा, महाविद्यालयातील मुख्याध्यापक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी, मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते.



सहविचार सभेची दीप प्रज्वलनाने सुरुवात झाली.

## देणगी, निधी संकलनाचा श्रीगणेशा

स्मारक उभारणीसाठी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी २ लाख ५१ हजार, चनशेट्टी प्रतिष्ठानकडून एक लाख रुपये, सुधाकर हलकुडे ५१ हजार, शंकरराव साखरे व सुभद्रा मुळे यांनी प्रत्येकी ५१ हजार रुपये तर डॉ. विवेक बिराजदार यांनी २५ हजार रुपये देणगी जाहीर केली.

जनमत सर्वसामान्यांचे

उस्मानाबाद जिल्हा-विशेष

# पुढच्या पिढीसाठी प्रेरणादायी गुरुजींचे प्रेरणास्थळ : आ.चौगुले

गुरुनाथ कबाडे

अणदूर, दि.२९ :- शिक्षण महर्षी सि.ना.आलुरे गुरुजी यांचे विचार आणि आचरण हे आपणा सर्वांना आणि महाराष्ट्राला परीचीतच आहे. पण ज्यांना गुरुजी आणि गुरुजींचे कार्य माहीत नाही अशा भावी पिढी समोर एक आदर्शवतअसे प्रेरणा स्थळ निर्माण होणे गरजेचे आहे आणि ही संकल्पना आपल्या सर्वांच्या मनामध्ये आली हे खूप महत्त्वाचे असल्याचे मत उमरग्याचे आमदार ज्ञानराज चौगुले यांनी व्यक्त केले.

ते शनिवारी अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात आलुरे गुरुजी यांच्या प्रेरणास्थळ उभा करण्याच्या संकल्पने संबंधी आयोजित सहविचार सभेत बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण होते. तर व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अस्मिता कांबळे, उस्मानाबादचे माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, सेवानिवृत्त न्यायाधीश ज्ञानेश्वर मरगंडे, गुरुजींचे मित्र नीलकंठ नरे, सेवानिवृत्त शिक्षण संचालक एन. के. कुलकर्णी, दक्षिण सोलापूर चे माजी सभापती भीमाशंकर जमादार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवदास कांबळे, जिल्हा परिषदेचे सदस्य बाबुराव चव्हाण, अणदुर चे सरपंच रामचंद्र आलुरे, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, अंजनी प्रशालेच्या सुभद्रा मुळे उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार चौगुले म्हणाले की मी जवाहर विद्यालयाचा विद्यार्थी आणि वस्तीग्रहाचा विद्यार्थी आहे, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिक्षण घेतले, संस्कार आणि शिस्तीचे धडे आलुरे गुरुजी यांच्याकडून मिळाले. विद्यार्थिदशेत असतानाच अणदुर हे गाव जिल्ह्याच्या राजकारणाचे केंद्रबिंदू होते. त्यामुळे राजकारणाचे धडे मिळाले. शिक्षण घेतल्याने नोकरी मिळाली. त्याचबरोबर राजकीय धडे मिळाल्याने आमदारही झालो. असे सांगून सामाजिक कार्याची धडे येथे मिळाल्याने आमदार असो या नसो कायमस्वरूपी सामाजिक कार्य करत राहणार असे सांगितले आणि गुरुजींच्या प्रेरणा स्थळासाठी अडीच लाख रुपये देणगी देण्याचे जाहीर केले. आणि प्रसंगी गरज पडेल तेव्हा मदत करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी भीमाशंकर जमादार, नानासाहेब पाटील, बाबुराव चव्हाण, अस्मिता कांबळे, यांचीही भाषणे झाली. याप्रसंगी प्रेरणा स्थळासाठी सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना सोलापूर चे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी आवश्यक ते सर्वतोपरी मदत करण्याचे दूरध्वनीद्वारे सांगितले. तसेच औरंगाबादचे ड. लक्ष्मीकांत पाटील यांनी पाच लाख रुपये. तुळजाभवानी कारखान्याचे माजी अध्यक्ष सिद्रामप्पा खराडे यांनी एक लाख रुपये, ग्लोबल विलेज बोरामणी संस्थेतर्फे उमाकांत चनशेट्टी यांनी एक लाख रुपये, शंकरराव साखरे यांनी एकावन्न हजार रुपये, सुभद्रा मुळे यांनी एकावन्न हजार रुपये,अण्दूर ग्रामपंचायतीचे सदस्य डॉ. विवेक बिराजदार यांनी पंचवीस हजार रुपये देणगी जाहीर केली. वास्तुविशारद शुभम



बादोले यांनी संग्रहालय, वाचनालय, थिएटर गुरुजींचा पंधरा फुटी पूर्णाकृती पुतळा, चित्र चरित्र हॉल, क्रीडा मैदान, स्पर्धा परीक्षा अभ्यास हॉल, बगीचा, पार्किंग यासह अनेक बाबींचा प्रारूप आराखडा सादर केला.

मंगलदारी आणि मरणदारी नेहमी उपस्थित राहणारे आलुरे गुरुजींचे प्रेरणा स्थळाचा हा नियोजित आराखडा जगन्नाथाचा रथ असून तो ओढण्यासाठी सर्वांनी मदत करण्याचे गरजेचे असल्याचे डॉक्टर उमाकांत शेट्टी यांनी प्रास्ताविकात सांगितले. सूत्रसंचालन डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले तर डॉक्टर अंकुश कदम यांनी आभार मानले. सहविचार सभेस उस्मानाबाद, लातूर, सोलापूर जिल्ह्यातील आजी-माजी विद्यार्थी, सेवानिवृत्त शिक्षक, विद्यमान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

---

# मुलाखतीद्वारे खालीलप्रमाणे जागा भरणे आहेत

## शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित

## जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर

ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

येथील अनुदानित विषयांकरिता वरिष्ठ महाविद्यालयासाठी खालील सहाय्यक प्राध्यापकांच्या जागा निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता (पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापकाची नियुक्ती होईपर्यंतच्या कालावधीसाठी) घड्याळी तासिका तत्त्वावर भरणे आहेत. उमेदवारांची निवड स्थानिक निवड समितीमार्फत करण्यात येईल. इच्छुक व पात्र उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्र व अर्जासह जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर येथे **सोमवार, दि. ०६/१२/२०२१ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता** मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे.

| अ. क्र. | विषय | घड्याळी तासिका पदे | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | रसायनशास्त्र | ०७ | एम.एस्सी.- नेट/सेट/पीएच.डी. |
| २ | भौतिकशास्त्र | ०२ | एम.एस्सी.- नेट/सेट/पीएच.डी. |
| ३ | प्राणिशास्त्र | ०४ | एम.एस्सी.- नेट/सेट/पीएच.डी. |
| ४ | वनस्पतिशास्त्र | ०७ | एम.एस्सी.- नेट/सेट/पीएच.डी. |
| ५ | समाजशास्त्र | ०३ | एम.ए.- नेट/सेट/पीएच.डी. |
| ६ | राज्यशास्त्र | ०१ | एम.ए.- नेट/सेट/पीएच.डी. |
| | एकूण पदे | २४ | |

**नियम/अटी :-** यु.जी.सी./महाराष्ट्र शासन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या नियमाप्रमाणे शैक्षणिक अर्हता बंधनकारक असेल तसेच **मागास प्रवर्गातील** पदे नियमाप्रमाणे भरण्यात येतील. पात्रताधारक उमेदवारांनीच मुलाखतीस उपस्थित राहावे.

**डॉ. उमाकांत चनशेट्टी**
प्राचार्य
**जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य, महाविद्यालय**
**अणदूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद**

**मा. श्री. भारत फुलचंद कस्तुरे**
अध्यक्ष
**शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर**
**ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद**

पुढारी

# आलुरे गुरुजींचे विचार पुढील पिढीला देण्यासाठी स्मारक उभारणी

## माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचे प्रतिपादन; स्मारक समितीची सभा



**अणदूर, पुढारी वृत्तसेवा :** शिक्षण महर्षी सि.ना आलुरे गुरुजी यांनी आपले संपूर्ण जीवन महात्मा गांधी,संत विनोबा भावे व साने गुरुजी यांच्या तत्त्वांवर घालवले. गुरुजींनी आपल्या जीवनात सत्य, अहिंसा व प्रेमाची शिकवण दिली. सर्वधर्म समभावाची शिकवण सर्वांमध्ये रुजवली,हेच विचार पुढील पिढीला देण्यासाठी गुरुजींचे स्मारक उभारण्याचा संकल्प केला आहे असे प्रतिपादन माजी मंत्री तथा स्व.सि ना आलुरे गुरुजी स्मारक समितीचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण यांनी व्यक्त केले.

शनिवारी (दि.२७) जवाहर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या स्मारक समिती सभेच्या अध्यक्षस्थावरून चव्हाण बोलत होते. व्यासपीठावर आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हा परिषद अध्यक्ष अस्मिता कांबळे, माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील,निवृत्त न्यायाधीश ज्ञानेश्वर भरगंडे, नीलकंठ नरे, सेवानिवृत्त समाजकल्याण उपसंचालक एम. के. कुलकर्णी,माजी सभापती भीमाशंकर जमादार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शिवदास कांबळे, जिल्हा परिषद सदस्य बाबुराव चव्हाण, तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष सिद्रामप्पा खराडे, तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्ष सुभद्रा मुळे, सरपंच रामचंद्र आलुरे, मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, महादेवप्पा आलुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार ज्ञानराज चौगुले यांनी स्मारकाच्या उभारण्यासाठी शासन दरबारी आवश्यक असणारी सर्व प्रक्रिया पूर्ण करून गुरुजींचा विद्यार्थी या नात्याने स्मारकाला सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे व ज्ञान-ज्योती सामाजिक संस्थेच्या वतीने दोन लाख एकावन्न हजार रुपये देणगी देणार असल्याचे जाहीर केले.

कार्यक्रमाची सुरुवात स्व. सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी अभियंता शुभम बदोले यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीस चित्रफितीव्दारे स्मारकाची रचना सादर केली. यावेळी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, आमदार ज्ञानराज चौगुले,नानासाहेब पाटील,जिल्हा परिषद अध्यक्ष अस्मिता कांबळे, बाबुराव चव्हाण,भीमाशंकर जमादार,सरपंच रामचंद्र आलुरे,सुभद्रा मुळे यांनी स्मारका विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष दीपक आलुरे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, ग्रामपंचायत सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, बाळकृष्ण घोडके-पाटील, डॉ. विवेक बिराजदार, धनराज मुळे, माणिक आलुरे, काशिनाथ शेटे बालाजी मोकाशे, बालाजी घुगे, संगमेश्वर जळकोटे, मारुती खोबरे, सिद्धराम धमुरे, दयानंद मुडके यांच्यासह गुरुजींवर प्रेम करणारे विविध क्षेत्रातील मान्यवर,ग्रामपंचायत सदस्य, माजी विद्यार्थी, शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व शाखांचे मुख्याध्यापक,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी,सूत्रसंचालन डॉ. एम. बी. बिराजदार यांनी तर डॉ.अंकुश कदम यांनी आभार मानले.

### असे असेल स्मारक

आठ हजार चौरस फुटांच्या जागेवर स्मारक उभारणार असून मध्यभागी वीस फुटी पिरॅमिड आकाराच्या चबुतऱ्यावर गुरुजींचा पंधरा फुटी पूर्णाकृती पुतळा,चबुतऱ्या खालील भागात ध्यान मंदिर व गुरुजींच्या सर्व भेट वस्तूंचे संग्रहालय,डाव्या बाजूला सुसज्ज ग्रंथालय,उजव्या बाजूस पाचशे लोक बसतील असे एक मोठे सभागृह,एक मोकळे सभागृह तर इतर जागेत बगीचा असेल.

### यांनी जाहीर केला निधी

स्मारकाच्या उभारणी कामात लक्ष्मीकांत पाटील पाच लाख, आमदार ज्ञानराज चौगुले दोन लाख एकावन्न हजार ,कै. ब इ चनशेट्टी प्रतिष्ठानच्या एक लाख,सुधाकर हलकुडे ५१ हजार, शंकरराव साखरे ५१ हजार, सौ सुभद्राताई मुळे ५१ हजार, डॉ. विवेक बिराजदार २५ हजार निधी जाहीर केला.

My Latur Edition
Nov 29, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

लोकमत

सहविचार बैठकीत सर्वानुमते निर्णय

# अणदुरात उभारणार आलुरे गुरुजींचे स्मारक

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील शिक्षणमहर्षी, माजी आमदार सि. ना. आलुरे गुरुजी यांचे शैक्षणिक, सामाजिक, सहकार, राजकीय कार्ये तसेच तालुक्याच्या विकासासाठी त्यांचे योगदान लक्षात घेता, त्यांच्या स्मरणार्थ अणदूर येथे प्रेरणास्थळ(स्मारक) उभारण्याचा निर्णय सहविचार सभेत घेण्यात आला.

अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार ज्ञानराज चौगुले, नानासाहेब पाटील, महादेवाप्पा आलुरे, रामचंद्र आलुरे उपस्थित होते. स्मारक उभारणीसंदर्भाने आ. ज्ञानराज चौगुले, बाबुराव चव्हाण, भीमाशंकर जमादार, जि. प. अध्यक्षा अस्मिताताई कांबळे, नानासाहेब पाटील, रामचंद्र आलुरे यांनी आपले विचार मांडले. मधुकरराव चव्हाण यांनीही स्मारकासाठी सर्वतोपरी मदत, सहकार्य करण्याचे अभिवचन दिले. सहविचार सभा चालू असतानाच काही मान्यवरांनी स्मारक निधी देण्याची घोषणा केली.



अणदूर येथे सहविचार सभेचे उद्घाटन करताना माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, आ. ज्ञानराज चौगुले व अन्य.

यावेळी जि. प. चे माजी अध्यक्ष शिवदास कांबळे, तुळजाभवानी कारखान्याचे माजी चेअरमन सिद्रामाप्पा खराडे, सेवानिवृत्त शिक्षक नीलकंठ नरे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, ग्रा. पं. सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, बाळकृष्ण घोडके-पाटील, डॉ. विवेक बिराजदार, माजी सभापती बालाजी मोकाशे, माजी सरपंच धनराज मुळे, माणिक आलुरे, दयानंद आपशेट्टी, सिद्धेश्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष ॲड. दीपक आलुरे, विक्रम आलुरे, दयानंद मुडके, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सर्व शाळा, महाविद्यालयांतील मुख्याध्यापक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अणदूर पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. प्रास्ताविक जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, सूत्रसंचालन प्रा. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले. आभार प्रा. अकुंश कदम यांनी मानले.

Hello Osmanabad
Page No. 2 Nov 29, 2021
Powered by: erelego.com

# युवा पिढीसाठी आलुरे गुरुजींचे विचार प्रेरणादायी

## स्मारक समिती सभेच्या बैठकीत स्मारकासाठी आग्रह

संचार वृत्तसेवा

अणदूर, दि. २८- शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांनी आपले संपूर्ण जीवन महात्मा गांधी, संत विनोबा भावे व साने गुरुजी यांच्या तत्त्वावर जगले. गुरुजींनी सर्वधर्म समभावाची शिकवण रुजवली. हेच विचार युवा पिढीला प्रेरणादायी ठरणार आहेत, असे प्रतिपादन आलुरे गुरुजी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा माजीमंत्री मधुकरराव चव्हाण यांनी केले.



अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात आयोजिलेल्या स्मारक समिती सभेच्या बैठकीत माजीमंत्री चव्हाण बोलत होते. यावेळी उमरगा-लोहाऱ्याचे आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हा परिषद अध्यक्षा अस्मिता कांबळे, माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, निवृत्त न्यायाधीश ज्ञानेश्वर भरगंडे, नीलकंठ नरे, निवृत्त समाजकल्याण उपसंचालक एम. के. कुलकर्णी, माजी सभापती भीमाशंकर जमादार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शिवदास कांबळे, जिल्हा परिषद सदस्य बाबुराव चव्हाण, तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष सिद्रामप्पा खराडे, तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सुभद्रा मुळे, सरपंच रामचंद्र आलुरे, मुख्याध्यापक सुरेश टोंबरे, महादेवप्पा आलुरे, दीपक आलुरे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. यावेळी आमदार चौगुले यांनी ज्ञानज्योती सामाजिक संस्थेच्यावतीने २ लाख ५१ हजार रुपये देणगी देणार असल्याचे जाहीर केले.

दरम्यान, स्मारकाच्या उभारणीसाठी लक्ष्मीकांत पाटील ५ लाख, चनशेट्टी प्रतिष्ठान एक लाख, सुधाकर हलकुडे ५१ हजार, शंकरराव साखरे ५१ हजार, सुभद्राताई मुळे ५१ हजार, डॉ. विवेक बिराजदार यांनी २५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली आहे.

यावेळी डॉ. नागनाथ कुंभार, ग्रामपंचायत सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, बाळकृष्ण पाटील, डॉ. विवेक बिराजदार उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. एम. बी. बिराजदार यांनी तर डॉ. अंकुश कदम यांनी आभार मानले.

## शिक्षण महर्षी सि .ना. आलुरे गुरुजी स्मारकासाठी २७ रोजी सहविचार सभा

**अणदूर, दि.२५ नोव्हेंबर-**




शिक्षण महर्षी सि .ना. आलुरे गुरुजीचे आदर्श येणाऱ्या पिढीसमोर ठेवण्यासाठी व गुरुजींचे समाधी प्रेरणा स्थळ म्हणून उभा करण्याचा संकल्प असून त्यासंदर्भात शनिवारी २७ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वा. जवाहर महाविद्यालय येथे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली अणदूर व परिसरातील सर्व माजी विद्यार्थी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी ,विविध संस्थांचे पदाधिकारी ,सामाजिक राजकीय ,सहकार ,शैक्षणिक ,व्यापार, उद्योग आणि वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या पदाधिकाऱ्यांना उपस्थित राहून मार्गदर्शन करण्याचे आवाहन निमंत्रक प्राचार्य, डॉ.उमाकांत चनशेट्टी यानी केले आहे.

लोकमत

# मौलाना आझाद यांची जयंती साजरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांची जयंती राष्ट्रीय शिक्षण दिवस म्हणून साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. अनिता मुदकन्ना डॉ. एस. व्ही. राजमाने, डॉ. मल्लीनाथ लंगडे, डॉ. राजशेखर नळगे, डॉ. एम. बी बिराजदार, डॉ. संजय कुलकर्णी, प्रा सत्येंद्र राऊत, डॉ. मारुती मुसांडे, डॉ मीना जाधव, डॉ. एस. एस. बाड काशिनाथ करपे, डॉ. जी. टी. राठोड डॉ. अमोल पाचपिंडे, डॉ. विश्वास माने संतोष चौधरी, प्रा. सुरेखा भारती आदींची उपस्थिती होती. डॉ. एम. बी बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले.

Hello Osmanabad
Page No. 4 Nov 12, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

आय विटनेस

# जवाहर महाविद्यालयात कोरोना लसीकरण



**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवायोजना मिशन युवा स्वास्थ्य अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थी व प्राध्यापक, कर्मचाऱ्यांसाठी २६ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत कोविड लसीकरण मोहीम राबविली जात आहे. याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. यावेळी रासेयो विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे, डॉ. अनिता मुदकन्ना, डॉ. मल्लीनाथ बिराजदार, डॉ. राजशेखर नळगे, डॉ. मल्लीनाथ लंगडे, डॉ. सोमशंकर राजमाने, डॉ. धनराज कदम, डॉ. सत्येंद्र राऊत, प्रा. मारुती मुसांडे, प्रा. सहदेव बिराजदार, डॉ. राजशेखर वरशेट्टी, काशिनाथ करपे, दिलीप चव्हाण, नामदेव काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यासाठी आरोग्य पर्यवेक्षक एम. ए. काझी, आशा गटप्रवर्तिका राजश्री चव्हाण, अनुराधा पापडे, परिचारिका संगीता क्षीरसागर, संतोष सुरवसे व राष्ट्रीय सेवायोजना विभागातील विद्यार्थी, प्राध्यापकांनी पुढाकार घेतला.

Hello Osmanabad
Page No. 3 Oct 27, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

## अंकुश कदम यांचा नियुक्तीबद्दल सत्कार



**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. अंकुश कदम यांची महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या बैठकीत सदस्यपदी नियुक्ती झाली. याबद्दल नळदुर्ग येथील बालाघाट महाविद्यालयाच्या वतीने जवाहर महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चन्नशेट्टी, डॉ. समीर पाटील, डॉ. एच. के. जाधव, प्रा. एन. जी. शेरे, प्रा. नेताजी बिराजदार, प्रा. एस. डी. घोडके, प्रा. वाय. एस. पाटील, डॉ. मल्लीनाथ बिराजदार, डॉ. मल्लीनाथ लंगडे यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते.

Hello Osmanabad
Page No. 4 Oct 16, 2021
Powered by: erelego.com

## गांधी अजूनही जिवंत आहेत : डॉ उमाकांत चन्नशेट्टी

**तभा वृत्तसेवा**

**अणदूर, दि.२ ऑक्टोंबर -**

महात्मा गांधी यांची अस्पृश्यता निवारण, स्वदेशीची शिकवण, त्यांचे सत्याचे प्रयोग, समाजातील भेदाभेद निर्मुलन, सामाजिक एकोपा या शिकवणीनुसार देशांमध्ये परिवर्तन होत आहे. त्यामुळे महात्मा गांधीजी अजुनही जिवंत आहेत, असे मत अणदूर येथील जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ उमाकांत चन्नशेट्टी यांनी व्यक्त केले.

शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित जवाहर महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त व जवाहर महाविद्यालयाच्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्यागांधी समज आणि गैरसमज या व्याख्यानात मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक तथा अणदूर येथील सरपंच रामचंद्र आलुरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ अनिता मुदकन्ना, डॉ अंकुश कदम, पत्रकार दयानंद काळुंके, मकरंद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ. उमाकांत चन्नशेट्टी म्हणाले की गांधीवाद आणि आंबेडकरवाद असा भेदाभेद करुन समाजामध्ये गांधीजी यांच्याबद्दल समज गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न झालेला आहे. मुळात दोघांचे विचार, ध्येय हे देशहिताचेच होते. तेव्हा गांधीची समजुन घेऊन समाजात वाढत चाललेली विषमतेची दरी कमी करावी असे आवाहन डॉ. चन्नशेट्टी यांनी केले. यावेळी राष्ट्रीय सेवायोजना विभागाच्या वतीने प्राध्यापक, विद्यार्थी,व प्रमुख



पाहुणे यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रास्ताविक डॉ.एम.बी. बिराजदार यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुर्यकांत आगलावे यांनी केले.

यासाठी डॉ. अंकुश कदम, डॉ.एस.व्ही. माने, डॉ.डि.एस. सुर्यवंशी, काशिनाथ करपे, डॉ. अमोल पाचपिंडे, विजय बागडे, संतोष चौधरी यांनी पुढाकार घेतला होता.

पुण्यनगरी

# जिल्हाभर गांधी, शास्त्री यांना अभिवादन, वंदन

**शासकीय, निमशासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालयात विविध कार्यक्रम ■ व्याख्यान, राष्ट्रगीत गायन, स्वच्छता मोहीम यासह विविध समाजोपयोगी उपक्रम**


अणदूर


डोकी


येणेगुर


दाळींब


उस्मानाबाद


लोहारा


उस्मानाबाद


पाथर्डी


खामसवाडी


कळंब

पुण्य नगरी । वृत्तसेवा

**उस्मानाबाद:** राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती शनिवारी (दि.२) जिल्हाभर विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. शासकीय, निमशासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालयासह विविध राजकीय पक्ष,सामाजिक संघटनांच्या वतीने प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. व्याख्यान, देशभक्तीपर कार्यक्रम यासह विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. शहरातील डॉ.वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकूल येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले. कार्यक्रमास भैरवनाथ डी.फार्मसी कॉलेजचे प्राचार्य सूरज ननवरे, आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य गाझी शेख, प्रा. नागरगोजे, प्रा. अमोल मते, प्रा. राजश्री सुरवसे यांच्यासह कर्मचारीवृंद उपस्थित होते. यावेळी प्राचार्य ननवरे यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला तर प्राचार्य गाझी शेख यांनी महात्मा गांधी यांच्या शैक्षणिक कार्यांचा आढावा सादर केला.

## लोहारा येथे विविध कार्यक्रम

**लोहारा:** शहरातील शंकरराव जावळे पाटील महाविद्यालयात मनोज पाटील यांच्या हस्ते महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आल यावेळी आजादी का महोत्सव या उपक्रमांतर्गत राष्ट्रगीताचे सामूहीक गायन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने परिसर स्वच्छता करण्यात आली. यावेळी एन. एस. एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद आचार्य, डॉ. एस. व्ही. सोनवणे, डॉ. सोमवंशी, प्रा. डी. एन. कोटरंगे ,डॉ. बी. एस. राजोळे, प्रा. डी. एन. कोटरंगे, डॉ. एस. एन. बिराजदार, प्रा. डी.व्ही. बंगले, डॉ. शिरीष देशमुख, नंदकिशोर माने, प्रविण पाटील, परमेश्वर कदम यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## खामसवाडी येथे प्रतिमापूजन

**खामसवाडी:** कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील प्रियदर्शनी सार्वजनिक वाचनालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले.कार्यक्रमास अध्यक्ष बिभिषन शेळके, सचिव प्रदीप जोशी, कोषाध्यक्ष दत्तात्रय यादव, ग्रंथपाल एकनाथ घाटुळे, जगदिश जोगी यांच्यासह वाचलक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## के टी.पाटील महाविद्यालय

**उस्मानाबाद:** शहरातील के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात उपप्राचार्य सुधीर पानें यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या राष्ट्र कार्याविषयी यावेळी सविस्तर माहिती सांगण्यात आली. कार्यक्रमासाठी रा. से. यो. विभाग प्रमुख श्री.अलकुंटे, उपविभाग प्रमुख रुबिया काझी, शिवरत्न खरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

## तुळजापूर येथे स्वच्छता अभियान

**तुळजापूर :** येथील तुळजाभवानी महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आजादी का अमृतमहोत्सव या कार्यक्रमांतर्गत कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीजींच्या मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी प्रा. अशपाक अत्तार, विश्वास कदम, प्रविण अमृतराव, एस. एस. कदम, एम. एन. मगरे, के. एस. कदम, एस. टी. वागतकर, प्रा. डम. जी. वसावे, प्रा. बाळासाहेब कुकडे, प्रा. डॉ. एम. आर. आडे, प्रा. डॉ. बी. डब्ल्यू. गुंड यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. एस. एम. देशमुख, कार्यक्रमाधिकारी प्रा. अण्णासाहेब वसेकर,प्रा. विवेकानंद चव्हाण यांनी परिश्रम घेतले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या ४० स्वयंसेवकांनी या स्वचछता अभियानात सहभाग नोंदविला.

## भाजपा कार्यालयात पूजन

**कळंब :** येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात राष्ट्रपती महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी भाजयुमोचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य मकरंद पाटील, तालुकाध्यक्ष प्रशांत लोमटे, तालुका सरचिटणीस संजय जाधवर, शिवाजी गिड्डे, शहराध्यक्ष संदिप बावीकर, आबासाहेब रणदिवे, पप्पु गायकवाड, रंगराव काळे आदी उपस्थित होते.

## पाथर्डी येथे सराव परीक्षा

**कळंब :** तालुक्यातील पाथर्डी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जयंतीनिमित्त नवोदय व शिष्यवृत्ती सराव परीक्षा घेण्यात आली. यावेळी सुशिल फुलारी, केंद्रप्रमुख पांडुरंग गामोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक राजेंद्र विक्कड, सरपंच नानासाहेब पिंगळे, माजी सरपंच अर्जुन जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मधुकांत पिंगळे, ग्रामस्थ,पालक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी शिक्षक राजेंद्र पवार, शिक्षिका आशा पवार, सुरेखा भाक्ले, मनिषा पवार यांनी पुढाकार घेतला.

## मोहेकर महाविद्यालयात प्रतिमापूजन

**कळंब :** येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात डॉ. अशोक मोहेकर, प्राचार्य डॉ. सुनिल पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी डॉ. एम. डी गायकवाड, डॉ. डी. एन.चिते, प्रा.मोहन जाधव, डॉ. के. डी. जाधव, डॉ. डी. ई. मुंडरे, डॉ. हेमंत चांदोरे, प्रा. राहुल मिसे, डॉ. हरीभाऊ पावडे, डॉ. संदीप महाजन, डॉ. नामानंद साठे, हनुमंत जाधव, संतोष मोरे, अरविंद शिंदे, अमोल सुरवसे, संदीप सूर्यवंशी, अर्जुन वाघमारे, उमेश साळुंखे, चांगदेव खंदारे आदी उपस्थित होते.

## नवोदय विद्यालयात स्वच्छता मोहीम

**तुळजापूर :** येथील नवोदय विद्यालयात जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी परिसराची स्वच्छता केली. यावेळी प्राचार्य के. वाय. इंगळे, उपप्राचार्य एस. वी. स्वामी, अध्यापक एस. एच. गायकवाड, एस. जी.भोरगे, सी. एस. गोमारे, एच. जी. जाधव, पी.एन. जोशी आदी उपस्थित होते.

## जवाहर विद्यालयात व्याख्यान

**अणदूर:** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीसह महाविद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी व्याख्यान कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास सरपंच रामचंद्र आलुरे, डॉ. अनिता मुदकन्ना, डॉ.अंकुश कदम, दयानंद काळुंके, मकरंद पाटील आदी उपस्थित होते. यावेळी डॉ.उमाकांत चन्नशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.एम.बी.बिराजदार यांनी तर आभार डॉ. सुर्यकांत आगलावे यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ.अंकुश कदम, डॉ.एस.व्ही.माने, डॉ.डी.एस. सुर्यवंशी, काशिनाथ करपे, डॉ.अमोल पाचपिंडे, विजय बामडे, संतोष चौधरी यांनी पुढाकार घेतला.

## दस्तापूर येथे सातबारा वाटप

**लोहारा:** भाजपच्या वतीने तालुक्यातील दस्तापुर ग्रामपंचायत कार्यालयात प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील, पंचायत समिती सदस्य वामन डावरे, उपसरपंच सोमनाथ पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमात ग्रामस्थांना मोफत सातबारा वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विक्रांत संगशेट्टी, आयुब शेख, इकबाल मुल्ला, दगडू तिगाडे, कमलाकर सिरसाट, मल्लिनाथ फावडे, प्रमोद पोतदार, बालाजी चव्हाण, कल्याण ढगे, उमा स्वामी, लक्ष्मण माने, तलाठी पंढरगिरी, ग्रामसेवक इंगळे, गजेंद्र डावरे, कोतवाल धोंडिराम गड्डे, यांच्यासह दस्तापुर येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात पूजन

**उस्मानाबाद :** येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी श्रीमती शुभांगी आंधळे, जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक कुलकर्णी, नायब तहसीलदार श्रीमती शिल्पा कदम, पंकज मंदाडे, अव्वल कारकून एस.जी.चव्हाण, नरसिंह ढवळे, महेश कुलकर्णी, शेख शाकीर आणि युवराज तांदळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## रा.प. महाविद्यालयात स्वच्छता

**उस्मानाबाद :** येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील रासेयो व एनसीसी विभाग यांच्या वतीने जयंतीनिमित्त श्रमदानातून करत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख,प्रा. डॉ. शांतीनाथ घोडके, उपप्राचार्य प्रा. बबन सूर्यवंशी, प्रा. डी. एम. शिंदे,प्रा. डॉ. नितीन गायकवाड, प्रा.आवटे, प्रा. माधव उगीले, प्रा. बालाजी नगरे,प्रा. मोहन राठोड, प्रा.स्वाती बैनवाड, प्रा. डॉ. केशव क्षीरसागर, प्रा. राजा जगताप, प्रा. वैभव आगळे उपस्थित होते.

## संत विद्यालयात प्रतिमापूजन

**तेर :** उस्मानाबाद तालुक्यातील तेर येथील महाराष्ट्र संत विद्यालयात जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. सुर्यकांत खटिंग, डी.डी.राऊत, एम.एन.शितोळे, आर.एम.देवकते, एस.यु.गोडगे, महादेव भंडारे, हरी खोटे, एस.डी.घाडगे, सतीश भालेराव आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## नूतन विद्यालयात अभिवादन

**उस्मानाबाद:** शहरातील नूतन प्राथमिक विद्यामंदिरात प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक प्रदिपकुमार गोरे, संजय जाधव, प्रविण गोरे, बंडू मदने यांच्यासह शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## दाळींब येथे कचरा कुंड्याचे वाटप

**दाळींब :** उमरगा तालुक्यातील दाळींब येथील कचरा व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायतच्या वतीने प्लॅस्टिकच्या कचरा कुंड्याचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य धनराज हिरमुखे, सरपंच सोमनाथ कुंभार, उपसरपंच इरफान जहागीरदार, ग्रामपंचायत सदस्य प्रभारी गटविकास अधिकारी वाघ, ग्रामसेवक कदम आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन श्री. चाकूरे, प्रास्ताविक बाबा जाफरी तर आभार सरपंच सोमनाथ बिराजदार यांनी मानले.

## कॅप्टन जोशी विद्यालयात पूजन

**येणेगूर:** उमरगा तालुक्यातील येणेगुर येथील कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयात जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष देवराज बिराजदार, मुख्याध्यापक संगप्पा बादुले, शंकर हुलमजगे, आनंदराज बिराजदार, सौरव उटगे, व्यंकट बिराजदार, गोपाळ गेडाम, चंद्रकांत बिराजदार, महेश हरके, महेश खंडाळकर, अविनाश दुनगेकोमल-कीर्ति, पार्वती जगताप, सुप्रिया झिंगाडे, कालिंदी भाले, सुवर्णा कलशेट्टी, प्रदीप शिंदे, गणेश जोजन, अप्पू मुदकण्णा आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

## विजोरा ग्रापंमध्ये प्रतिमापूजन

**वाशी :** तालुक्यातील जि.प. शाळा वनगरवाडी व विजोरा ग्रामपंचायत कार्यालयात प्रतिमा पुजन करण्यात आले. यावेळी काँग्रेस सेवा दल अध्यक्ष विलास शाळू, सरपंच संजय सावंत, अवधुत क्षिरसागर, अमोल बोडके, बाळासाहेब गपाट, शामराव भोसले आदी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांना मोफत सातबाराचे वाटप करण्यात आले. विजय नाईकवाडी, विनयराज देशमुख, संजय खोसे, संदीप मोरे, अमोल खोसे, विनोद खोसे, राजाभाऊ सावंत, श्रीराम चव्हाण, सतीश जिरेकर, तुषार भैरट, अरविंद खोसे, विनोद तळेकर, बापूराव मेटे, मारुती क्षिरसागर, क्षिरसागर सर, बालाजी बोडके, नितीन बोडके, भाऊसाहेब महानवर, जगन्नाथ बोडके, बळीराम लांडगे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## ढोकी ग्रापंमध्ये पूजन

**ढोकी :** उस्मानाबाद तालुक्यातील ढोकी ग्रामपंचायत कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच नाना चव्हाण, उपसरपंच अमोल समुद्रे, ग्रामविकास अधिकारी अतुल पवार, ग्रापं सदस्य शकील काजी, बारी काजी, दत्ता तिवारी, इरफान कुरेशी, दगडू घावारे, मुजीब पठाण, आयुब पठाण, ॲड. अजित खोत, पोलीस पाटील राहुल पाटील, दौलत गाढवे, गुणवंत सुतार, अस्लम पठाण, चंद्रकांत ढवारे, भगवान पवार, प्रभाकर गाढवे, हसन शेख यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## बलसूर येथे अभिवादन

**बलसूर :** उमरगा तालुक्यातील बलसुर येथील ग्रामपंचायत कार्यालयात शनिवारी (दि.१) राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त उपसरपंच सुरेश वाकडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी तलाठी जगदिश लांडगे, ग्रापं सदस्य पवन पाटील, ग्रामविकास अधिकारी एस. आर. पांढरे, माजी सरपंच माधव कांबळे, विनायक हाडोळे, माधव नांगरे, अतुल हिंगमिरे, इंद्रजित मुडमे, बलभिम मिरगुडे, मनोहर पाटील, मनोज बनसोडे, मनोहर पाटील, आनंद कांबळे आदींची उपस्थिती होती.


तुळजापूर


लोहारा


वाशी

Smart Osmanabad
Page No.3 October 03, 2021

पुढारी

# जवाहर महाविद्यालयात व्याख्यान

**अणदूर :** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त व जवाहर महाविद्यालयाच्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या 'गांधी समज आणि गैरसमज' या व्याख्यानात मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक तथा सरपंच रामचंद्र आलुरे होते. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अनिता मुदकन्ना,डॉ अंकुश कदम,पत्रकार दयानंद काळुंके, मकरंद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. महात्मा गांधी यांची स्वदेशीची शिकवण,त्यांचे सत्याचे प्रयोग, समाजातील भेदाभेद निर्मूलन, सामाजिक एकोपा या शिकवणीनुसार देशांमध्ये परिवर्तन होत आहे, त्यामुळे महात्मा गांधीजी अजूनही जिवंत आहेत, असे मत जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चन्नशेट्टी यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.एम. बी. बिराजदार यांनी केल. आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ.सूर्यकांत आगलावे यांनी केले.यासाठी डॉ.अंकुश कदम,डॉ. एस. व्ही. माने,डॉ. डी. एस. सूर्यवंशी, काशिनाथ करपे, डॉ. अमोल पाचपिंडे, विजय बागडे, संतोष चौधरी यांनी पुढाकार घेतला. राष्ट्रीय सेवायोजना विभागाच्या वतीने प्राध्यापक, विद्यार्थी व प्रमुख पाहुणे यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.



लोकमत

शाळा, महाविद्यालय, शासकीय-निमशासकीय कार्यालयात झाले प्रतिमा पूजन

# जिल्हाभरात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**उस्मानाबाद :** शहरासह जिल्हाभरात शनिवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त शाळा, महाविद्यालय, विविध शासकीय-निमशासकीय कार्यालयात प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. शाळा, महाविद्यालयाच्या वतीने ऑनलाईन व ऑफलाईन विविध उपक्रम राबविण्यात आले.

**जिल्हाधिकारी कार्यालय**

उस्मानाबाद : राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त येथील जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता, जिल्हाधिकारी कार्यालयातील सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे, जिल्हाधिकारी यांचे स्वीय साहाय्यक कुलकर्णी, नायब तहसीलदार शिल्पा कदम, पंकज मंदाडे, अव्वल कारकून एस. जी. चव्हाण, नरसिंह ढवळे, महेश कुलकर्णी, शेख शाकीर आणि युवराज तांदळे, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

**विद्यानिकेतन आश्रमशाळा**

उस्मानाबाद : तालुक्यातील शिंगोली येथील विद्यानिकेतन माध्यमिक आश्रमशाळा व आदर्श विमुक्त जाती प्राथमिक आश्रमशाळेच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला प्राथमिक मुख्याध्यापक शिंदे, पर्यवेक्षक शेख, आर. बी. पाटील, कुंभार, खबोले, पडवळ, बडदापुरे, जाधव, कांबळे व कागे तसेच शिक्षकेतर कर्मचारी माळी, भिसे, मस्के, चव्हाण, बनसोडे उपस्थित होते.

**शिवशक्ती विद्यालय, उमरगा**

उमरगा : तालुक्यातील एकुरगा येथील श्री शिवशक्ती विद्यालयात ज्ञानविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश बोंडगे यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे सचिव शिवानंद करके यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी अभिषेक जवळगे, बिराजदार पद्मिनी, शिरसे शिवानी, गायकवाड भाग्यश्री या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विजया गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानिमित्त वक्तृत्व, निबंध, चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच वैयक्तिक आरोग्य तपासणी व शालेय परिसर स्वच्छता करण्यात आली. सूत्रसंचालन अजित साळुंके यांनी केले. यावेळी धनराज पाटील, राजेंद्र सगर, सिद्धेश्वर वाकडे, महादेव करके, म्हाळप्पा कोकरे, सोमनाथ म्हेत्रे, दत्तू कांबळे, मोहन दुधंबे, शिवाजी चेंडके आदी उपस्थित होते.

**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय**

तुळजापूर : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात उपप्राचार्य डॉ.नरसिंग जाधव आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.शिवाजी जेटीथोर यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बृहस्पती वाघमारे, प्रा.प्रमोद मुळे, प्रा.डॉ.एम.जी. देशमुख, प्रा.अमोद जोशी, राजकुमार बनसोडे आदी हजर होते.

**नरेंद्र आर्य विद्यालय**

तुळजापूर : तालुक्यातील आपसिंगा येथील नरेंद्र आर्य विद्यालयात ज्येष्ठ शिक्षक आप्पासाहेब डावकरे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी शिक्षक भगवान माळी, जयराज सूर्यवंशी, प्रकाश मगर, तुकाराम गोरे, बाळासाहेब चव्हाण, वेदभूषण चव्हाण, शरद पिंपरकर, जगन्नाथ जमादार आदी उपस्थित होते.

**नगर परिषद शाळा**

तुळजापूर : येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक ३ तुळजापूर (खुर्द) मुख्याध्यापक तुकाराम मोटे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. याप्रसंगी स्वच्छता काम करणारे कर्मचारी मीना वाळा, कल्पना व्हटकर, शाळेला सहकार्य करणारे स्वच्छता दूत दत्ता सगट यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला सहशिक्षक अशोक शेंडगे, बालाजी साळुंके, जालिंदर राऊत, विश्वनाथ निडवंचे आदी शिक्षकांची उपस्थिती होती.

**तीर्थ (खु) ग्रामपंचायत**

तुळजापूर तालुक्यातील तीर्थ (खु) येथील ग्रामपंचायतीमध्ये सरपंच बिरुदेव सोनटक्के यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपसरपंच प्रिया विनोद जाधव, ग्रामसेवक नितीन कांबळे, ग्रा.पं. सदस्य रामदास पवार, ब्रह्मानंद पाटील, नितीन जाधव, शोभाताई पटाडे, सत्यभामा पोतदार, शैला मोरे, विश्वभर पटाडे, विनोद जाधव, पोलीस पाटील अजय पवार आदी उपस्थित होते.

**लोहारा प्रशाला**

लोहारा : येथील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक मधुकर रोडगे यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी केंद्रप्रमुख मोहन शेवाळे, राजकुमार दीक्षित, सिद्रमाप्पा जट्टे, प्रताप साळुंखे, अमोल जट्टे, दत्तात्रय फावडे, वर्षा चौधरी, सावित्रा अकूलवार, महानंदा चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते.

**भाजपकडून जयंती साजरी**

लोहारा : तालुका भाजपच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेचे पूजन तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा चिटणीस विक्रांत संगशेट्टी, माजी नगरसेवक आयुब शेख, सरचिटणीस इकबाल मुल्ला, जिल्हा उपाध्यक्ष दगडू तिगाडे, कमलाकर सिरसाठ, मल्लिनाथ फावडे, प्रमोद पोतदार, बालाजी चव्हाण, कल्याण ढगे, उमा स्वामी, लक्ष्मण माने आदी उपस्थित होते.

**जि.प. शाळा कोरेगाव**

उमरगा : तालुक्यातील कोरेगाव जि. प. शाळेत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक प्रवीण स्वामी यांनी प्रतिमेचे पूजन केले. यावेळी अशोक बिराजदार, उमाचंद्र सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

**श्रमदानातून गांधी जयंती साजरी**

उस्मानाबाद : येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व एन.सी.सी. विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती स्वच्छता, श्रमदानातून साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमांचे पूजन प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांनी केले. पूजन झाल्यानंतर वेदिका कृष्णकांत मुळे या चिमुकलीने गांधीजींच्या कार्यावर मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. डॉ. शांतीनाथ घोडके, उपप्राचार्य प्रा. बबन सूर्यवंशी, प्रा. डी. एम. शिंदे, प्रा. डॉ. नितीन गायकवाड, प्रा. आदाटे, प्रा. माधव उगीले, प्रा. बालाजी नगरे, प्रा. मोहन राठोड, प्रा. स्वाती बैनवाड, प्रा. डॉ. केशव क्षीरसागर, प्रा. राजा जगताप, प्रा. वैभव आगळे उपस्थित होते.

**डॉ. वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकूल**

उस्मानाबाद : येथील डॉ.वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकूल येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी भैरवनाथ डी.फार्मसी कॉलेजचे प्राचार्य सूरज ननवरे, आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. गाझी शेख, प्रा. नागरगोजे, प्रा. अमोल मते, प्रा. राजश्री सुरवसे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. प्राचार्य सूरज ननवरे यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

**मोहेकर मल्टिस्टेट**

मोहा : येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर मल्टिस्टेटमध्ये महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चेअरमन हनुमंत मडके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यकारी संचालक विशाल मडके, माणिक आरकडे, मुख्य कार्यालय अधिकारी प्रमोद मडके, श्रीकांत मडके, अतुल मडके, इम्रान शेख, सूरज मडके, तसेच संस्थेचे कर्मचारी, सभासद, ग्रामस्थ उपस्थित होते.

**बलसूर ग्रामपंचायत**

बलसूर : उमरगा तालुक्यातील बलसूर येथील ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंच सुरेश वाकडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी डिजिटल इंडिया भूमी अभिलेख आधुनिकिकरन कार्यक्रमांतर्गत अधिकार अभिलेखांचे संगणकीकरण पूर्ण झाल्यामुळे शेतकऱ्यांना सातबारा उताऱ्याचे वाटप करण्यात आले. तसेच संगणीकरणामध्ये काही त्रुटी असल्यास शेतकऱ्यांनी अभिप्राय नमुना भरून तलाठी कार्यालयामध्ये देण्याचे आवाहन तलाठी जगदीश लांडगे यांनी केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य पवन पाटील, ग्रामविकास अधिकारी एस. आर. पांढरे, माजी सरपंच माधव कांबळे, विनायक हाडोळे, माधव नांगरे, अतुल हिंगमिरे, इंद्रजित मुडमे, बलभीम मिरगुडे, मनोहर पाटील, मनोज बनसोडे, मनोहर पाटील, आनंद कांबळे आदिंची उपस्थिती होती.

**छत्रपती शिवाजी हायस्कूल**

उस्मानाबाद : येथील छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय व आदर्श प्राथमिक विद्यामंदिर येथे प्राचार्य पी. एन. पाटील, मुख्याध्यापक एन. व्ही. शिंदे, पर्यवेक्षक एन. एम. देटे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी शिक्षक, शिक्षिका, व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

तामलवाडी येथील सरस्वती विद्यालयात प्रतिमेस अभिवादन करताना संस्था पदाधिकारी व अन्य मान्यवर.

## सरस्वती विद्यालयात जयंती साजरी

■ तामलवाडी : येथील सरस्वती विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे माजी चेअरमन मल्लिकार्जुन मसुते, तर प्रमुख पाहुणे त्र्यंबकेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बसवणप्पा मसुते, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, सचिव यशवंत लोंढे, संचालक गोरख माळी, अब्बास पटेल, नागनाथ मसुते, बाळासाहेब जगताप, प्राचार्य सुभाष जाधव व पर्यवेक्षक गणेश हलकरे होते. मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. सुहास वडणे यांनी प्रास्ताविक केले.

■ यावेळी शिक्षक औदुंबर माडजे, चंद्रकांत साळुंखे, चांगदेव सावळे, प्रभाकर जाधव, शिवकुमार सीताफळे, सुहास वडणे, महादेव मसुते, महादेव माळी, लक्ष्मण पाटील, विनोद कुंभार, प्रशांत चुंगे, बालाजी साठे, गिरीश जाधव, योगेश राऊत, गणेश स्वामी, बालाजी रणसुरे, दत्तू कोकरे, सुनील पाटील, महिला शिक्षिका शाहिदा पिरजादे, मनीषा गिरे, मनीषा सावंत, विठाबाई पाटील, सुहास वडणे आदी उपस्थित होते.

## जयप्रकाश विद्यालयात प्रतिमा पूजन

■ उस्मानाबाद : तालुक्यातील रुईभर येथील जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार व श्रीफल अर्पण करण्यात आले. याप्रसंगी माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, तालुका शिवसेना उपप्रमुख राजनारायण कोळगे, रुईभरचे सरपंच बालाजी कोळगे, प्रा. जयप्रकाश कोळगे, मुख्याध्यापिका शिवकन्या सांळुके, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक के. ए. डोंगरे, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## 'गांधी समज-गैरसमज' विषयावर व्याख्यान

■ अणदूर : येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहर महाविद्यालयात प्राचार्य डॉ. उमाकांत चन्नशेट्टी यांचे 'गांधी समज आणि गैरसमज' या विषयावर व्याख्यान पार पडले. या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक व अणदूर येथील सरपंच रामचंद्र आलुरे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. अनिता मुदकन्ना, डॉ. अंकुश कदम, मकरंद पाटील उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या-वतीने प्राध्यापक, विद्यार्थी व प्रमुख पाहुणे यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले तर डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. अंकुश कदम, डॉ. एस. व्ही. माने, डॉ. डी. एस. सूर्यवंशी, काशिनाथ करपे, डॉ. अमोल पाचपिंडे, विजय बागडे, संतोष चौधरी यांनी पुढाकार घेतला.

Hello Osmanabad
Page No. 4 Oct 03, 2021
Powered by: erelego.com

लोकमत



तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात हिंदी सप्ताहाचे उद्घाटन करताना डॉ.देविदास इंगळे, सरपंच रामचंद्र आलुरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी आदी.

Hello Osmanabad
Page No. 2 Sep 15, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# जवाहर महाविद्यालयात हिंदी सप्ताहास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात हिंदी सप्ताहाचे उद्घाटन उस्मानाबादच्या रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रोफेसर डॉ. देविदास इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी अणदूरचे सरपंच तथा बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक रामचंद्र आलुरे तर, प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी उपस्थित होते. यावेळी देविदास इंगळे, रामचंद्र आलुरे, डॉ. उमाकांत चन्नशेट्टी यांनी हिंदी भाषेचे महत्त्व व दैनंदिन जीवनात हिंदी भाषेचे योगदान, हिंदी भाषेच्या प्रसारामध्ये माध्यमांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी डॉ. मल्लिनाथ लंगडे, अण्णासाहेब आलुरे, लक्ष्मण बोंगरगे यांच्यासह राकेश दुधाळकर, विश्वजीत कसबे, संगणक अभियंता योगेश खराडे, दिलीप चव्हाण, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले.

Hello Osmanabad
Page No. 2 Sep 15, 2021
Powered by: erelego.com

जनमत सर्वसामान्यांचे

# देशाला एकतेच्या सूत्रात बांधून ठेवणारी एक मात्र भाषा हिंदी आहे : प्रा.डॉ. इंगळे

नळदुर्ग, दि. १४ (प्रतिनिधी) – जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर येथे हिंदी विभागाच्या वतीने १४ सप्टेंबर हिंदी दिनानिमित्त शिक्षण महर्षी स्वर्गीय सि.ना. आलुरे गुरुजी यांना समर्पित हिंदी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहाचे उद्घाटन रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रो.डॉ. देविदास इंगळे यांच्या हस्ते झाले याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अणदूरचे सरपंच तथा बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक, रामचंद्र आलुरे. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य ,डॉ. उमाकांत चन शेट्टी ,मल्लिनाथ लंगडे, अण्णासाहेब आलुरे ,लक्ष्मण बोंगरगे उपस्थित होते.उद्घाटक डॉ. इंगळे म्हणाले की, देशाला एकतेच्या सूत्रात बांधून ठेवणारी एक मात्र भाषाहिंदी आहे. ही भाषा मधुर, सरळ ,समजण्यासाठी सोपी आहे. सर्व भाषा श्रेष्ठ आहेत. भाषा समाजावर थोपवू नका .भाषेच्या माध्यमातून विचारांची



देवाण घेवाण होत असते, सहज असलेल्या भाषेचा स्वीकार करा .लोकशाही विचारावर आधारित आपला देश आहे .महात्मा गांधी ,लोकमान्य टिळक ,सुभाषचंद्र बोस यांनी हिंदी हीच राष्ट्रभाषा होऊ शकते, देशाची गौरव वाढवू शकते. अशा प्रकारची भावना व्यक्त केली. हिंदीच्या प्रचार प्रसारामध्ये आकाशवाणी ,दूरदर्शन ,चित्रपटाचा महत्त्वपूर्ण योगदान आहे .राष्ट्रगीत राष्ट्रध्वज या बरोबर देशाला राष्ट्रभाषेचे आवश्यकता आहे .ती हिंदीच पूर्ण करू शकते.प्रमुख पाहुणे रामचंद्र आलुरेम्हणाले की ,हिंदी भाषेमध्ये एक प्रकारची गोडवा आहे या भाषेत आईची माया प्रेम आहे हिंदी स्वीकारून देशाला एकतेच्या धाग्यात बांधूया. बस, रेल्वेस्थानक , हिंदी कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत संपर्क करणारी भाषा आहे .माखनलाल चतुर्वेदी सारखे अनेक महान कवींनी या भाषेला समृद्ध केलेला आहे. प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी म्हणाले की, गुलशन नंदा च्या साहित्यापासून प्रेमचंद यांच्या प्रभावी साहित्याचे उल्लेख करून समाजाला दिशा देण्याचे कार्य या साहित्य मधून झालेला आहे म्हणून साहित्य वाचा असे आवाहन केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी ,राकेश दुधाळकर, विश्वजीत कसबे ,संगणक अभियंता, योगेश खराडे ,दिलीप चव्हाण इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी मानले.

**पत्रकार : लतीफ(मामा) शेख, नळदुर्ग**

SMART उस्मानाबाद

## In Short

### जवाहर विद्यालयात हिंदी सप्ताहास प्रतिसाद



**अणदुर:** तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर येथे हिंदी विभागाच्या वतीने बुधवारी (दि.१४) हिंदी दिनानिमित्त शिक्षण महर्षी स्व. सि.ना.आलुरे गुरुजी यांना समर्पित हिंदी सप्ताह घेण्यात आला. या सप्ताहाचे उद्घाटन रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रोफेसर डॉ. देविदास इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच तथा बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक रामचंद्र आलुरे, अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. उमाकांत चन शेट्टी, मल्लिनाथ लंगडे, अण्णासाहेब आलुरे, लक्ष्मण बोंगरगे उपस्थित होते. कार्यक्रमास राकेश दुधाळकर, विश्वजीत कसबे, संगणक अभियंता योगेश खराडे, दिलीप चव्हाण आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी मानले.

# रक्तदान शिबिराने आलुरे गुरुजींना अभिवादन




**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ८ सप्टेंबर-**

शिक्षणमहर्षी, माजी आमदार कै. सि.ना.आलुरे गुरूजी यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यासाठी जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, जवाहर परिवार व महात्मा बसवेश्वर महाराज जन्मोत्सव समिती, अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबिरात १६६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. अध्यक्षस्थानी सरपंच रामचंद्र आलुरे हे होते.

शिबिराचे उद्घाटन बाबुराव भाऊ चव्हाण यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, जन्मोत्सव समितीचे सोमनाथ शेटे, श्रीशैल चौधरी, राचप्पा जिडगे, उमाकांत आलुरे, यश कर्पे, डॉ.सिद्धार्थ, डॉ.प्रद्युम्न, डॉ.भारत, डॉ.नागार्जुन जिंकले, उपसरपंच डॉ. कुंभार, डॉ.जितेंद्र कानडे, सिद्रामप्पा खराडे, डॉ. विवेक बिराजदार उपस्थित होते.

यावेळी पन्नासपेक्षा जास्त वेळा रक्तदान केलेल्या रक्तदात्यांचा बाबुराव चव्हाण यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक व प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.एम.बी.बिराजदार सर यांनी तर आभार प्रदर्शन प्रदीप कदम सर यांनी केले.

श्रद्धांजली

प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी

## कै.सि.ना.आलुरे गुरूजी : एक गांधीवादी व्यक्तिमत्त्व

**स्वातंत्र्य सैनिक, लोकशिक्षकव शिक्षणाची गंगा सामान्य माणसापर्यंत गावागावात पोहचविणाऱ्या गांधीवादी सि.ना.आलुरे गुरूजी यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या जीवनावर टाकलेला प्रकाश झोत.**



सुरू झाली शाळा आले गुरुजींचे गाव आई-बाबांच्या प्रेमाचे गुरुजी हे दुसरे नाव

अणदूर....! म्हटलं की आपसुकच ओठावर येते आलुरे गुरुजींच नाव आणि डोळ्यासमोर उभी राहते त्यांचे प्रसन्न असे गांधीवादी व्यक्तिमत्त्व. आपल्या कार्यकर्तृत्वाने मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण राज्याच्या इतिहासात स्मृती कोरून आपल्या अस्तित्वाचा कायम ठसा उमटविणारे शिक्षण महर्षी सि. ना. आलुरे गुरुजी...!

'गुरूजी' आपल्यातून गेलेत, त्यांचे निधन झाले आहे, ही कल्पनाच सहन होत नाही. अजूनही ते आपल्यात आहेत, आपल्या बरोबरच आहेत, प्रत्येकाकडे त्यांची नजर आहे, प्रत्येकाची ते आस्थेवाईकपणे चौकशी करीत आहेत. हीच भावना प्रत्येकाची आहे.

असो, नियती समोर कोणाचे काही चालत नाही हेच खरे...!

आमच्या पिढीने गांधी, विनोबा किंवा साने गुरुजी यांना पाहिलेले नाही. जे काही समजले ते त्यांचे जीवन चरित्र वाचनातून, अभ्यासातूनच समजले. परंतु या तिन्ही व्यक्तिमत्त्वांचा परिचय झाला तो शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या रूपाने.

महात्मा गांधीजींचा स्वावलंबी, स्वदेशी, मानवता, अस्पृश्योद्धार, ग्रामस्वराज्य...! विनोबाजींची ज्ञान परायण, सेवा परायण वृत्ती, सर्वोदय संकल्पना....! तर सानेगुरुजींच्या ठाई असलेला मातृप्रेम, वासल्य, करुणा, विद्यार्थी आणि शिक्षणाप्रति प्रेम....! या सर्व गुणांचा, विचारांचा वारसा आलुरे गुरुजींच्या अंगी पाहायला आणि अनुभवायला मिळाला. हे मी माझे भाग्य समजतो.

**गुरुजींचे शिक्षण:**

निजामी राजवटीखाली असलेल्या तुळजापूर तालुक्यातील अणदूर या छोट्याशा खेड्यात एका शेतकरी कुटुंबात दिनांक ६ सप्टेंबर १९३२ रोजी सि. ना. आलुरे गुरुजींचा जन्म झाला. अणदूरच्या पंचक्रोशीतील एक नावाजलेले कुटुंब. गावातल्या घराघरात सर्व मुखी असलेलं, प्रत्येकांच्या सुख-दुःखात समरस होणारे कुटुंब म्हणजे 'आलुरे कुटुंब' मोठे चुलते प. पू. रामचंद्र आलुरे उर्फ बाबा या कर्तृत्ववान पुरुषाचं छत्र असलेलं....! लोकमाता कै. लक्ष्मीबाई नागप्पा आलुरे या माऊली ची सावली असलेलं...! स्वतःच्या ताटातील घास भुकेल्यांना देण्याची संस्कृती असलेले कुटुंब...! अशा कुटुंबात जन्मलेले गुरुजी, म्हणजेच सिद्रामप्पा नागप्पा आलुरे गुरुजी !

स्वातंत्र्यपूर्व काळात या भागावर हैदराबादच्या निजामाची राजवट होती. गावात शिक्षणाची सोय नव्हती. जवळच्या नळदुर्ग येथे उर्दू माध्यमाची प्राथमिक शाळा होती. त्यामुळे गुरुजींचे प्राथमिक शिक्षण नळदुर्ग येथे उर्दूतून झाले. तुळजापूर येथे स्वातंत्र्यानंतर मराठी माध्यमाची माध्यमिक शाळा सुरु झाली. माध्यमिक शिक्षणासाठी गुरुजी तुळजापुरला गेले. हातानी स्वयंपाक करून शिक्षण घेतले. १९५२ ला मॅट्रिकचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर सोलापूर येथील दयानंद महाविद्यालयातून १९५६ साली बीएससी ची पदवी घेतली.

**शिक्षक म्हणून सेवेची सुरुवात:**

बीएससी झाल्यानंतर त्यांना पोलीस खात्यात फौजदार म्हणून नोकरीची संधी आली होती. परंतु त्यांनी शिक्षकच व्हायचे असा निश्चय केल्याने, फौजदाराची संधी सोडून दिले. लागलीच जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात शिक्षक म्हणून नियुक्तीसाठी हैदराबाद येथे मुलाखत झाली.

— साम्ययोग साधना / ११ —

## शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी



मराठवाड्याचे साने गुरुजी म्हणून ओळख असलेले, माजी आमदार, काँग्रेसचे तत्त्वनिष्ठ नेते तथा शिक्षणमहर्षी सि.ना. आलुरे (गुरुजी) ह्यांचे अल्पशा आजाराने ८९ वर्षी सोलापूरातील खासगी रुग्णालयात निधन झाले.

सिद्रामप्पा नागप्पा आलुरे गुरुजी हे सि.ना.आलुरे गुरुजी नावाने ओळखले जात. बाबा म्हणूनही त्यांची ओळख होती. पोतराज निर्मूलन, अनुसूचित जाती-जमातीमधील व्यक्तींना मंदिर प्रवेश, त्यांच्या हस्ते देवतांना अभिषेक व्हावा म्हणून झटणे... अशा उपक्रमांतून समतेचे मूल्य सामाजिक आणि राजकीय पातळीवर अबाधित राहावे या प्रयत्नांसह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सोयी निर्माण व्हाव्यात यासाठी अनेक वर्षे निष्ठेने काम करणारे सि.ना. आलुरे गेले. त्यांच्या नावानंतर गुरुजी असा शब्द उच्चारला गेला नाही तर त्यांची ओळख अपुरी वाटावी एवढा व्यावसायिक दबदबा त्यांनी त्यांच्या कामाने उभा केला. ग्रामीण भागात शिक्षणाचा दर्जा राखणाऱ्या, राष्ट्रीय संस्कार विकसित करणाऱ्या जवाहर विद्यालयातून अनेक विद्यार्थी त्यांनी घडविले. उस्मानाबाद जिल्ह्यातील आणि विशेषत: तुळजापूर तालुक्यातील विद्यार्थी डोक्यावर गांधी टोपी अक्षरश: मिरवितो. कारण या शाळांच्या गणवेशाचा टोपी हा अविभाज्य भाग होता. या टोपीमागचा विचार, शिकवण त्यांनी विद्यार्थ्यांपर्यंतही पोहोचवली. आलुरे यांनी तुळजापूर मतदारसंघात काँग्रेसचा झेंडा अनेक वर्षे फडकवत ठेवला. काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते अशी ओळख असणाऱ्या या कार्यकर्त्यावर साने गुरुजी, विनोबा भावे, पुढे नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांचा प्रभाव अधिक होता. त्यामुळे अनेक समाजसुधारणेची कामे त्यांनी केली. तुळजापूर तालुक्यात अनेक विद्यार्थी पोतराज होत. केस राखत. त्यांचे शिक्षण सुटून जाई. पण केस कापले की ही मुले सामान्यपणे जगू शकतात. शिकू शकतात असा विश्वास निर्माण करून देण्यासाठी आलुरे गुरुजींनी विशेष परिश्रम केले. दांडगा जनसंपर्क हे आलुरे गुरुजींचे वैशिष्ट्य. त्यामुळे अनेक वर्षे शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात असणारा तुळजापूर मतदारसंघ काँग्रेसकडे सरकला. १९८० च्या विधानसभा निवडणुकीत ते निवडून आले आणि त्यानंतर या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या मधुकरराव चव्हाण यांचा विजय आलुरे गुरुजींच्या शब्दांशिवाय पूर्ण होणे शक्य नसे. एका बाजूला राज्यभरच्या सामाजिक कार्यकर्त्यांशी संपर्क, दुसरीकडे सहकारी संस्था नीट चालव्यात म्हणून होणाऱ्या जाणीवपूर्वक प्रयत्नांना बळ देण्याचे काम त्यांनी केले. तुळजाभवानी सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीसह राज्य शिखर बँकेचे १५ वर्षे संचालक म्हणून काम करताना चुकीचे काही होऊ नये यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजही अनेकांच्या लक्षात आहेत. पांढरा शुभ्र सदरा, शुभ्र धोतर आणि टोपी या पेहरावात राहणाऱ्या आलुरे गुरुजी यांनी विनयशील स्वभावाचा संस्कार ते अध्यक्ष असणाऱ्या बालाघाट शिक्षण संस्थेत काम करणाऱ्यापर्यंत रुजविला. त्यासाठी ते आग्रही राहिले. म्हणूनच त्यांचे निधन पोकळी निर्माण करणारे आहे.

कथामाला परिवारातर्फे आलुरे गुरुजींना विनम्र आदरांजली !

(लोकसत्तावरून साभार)

### पोर्ट ट्रस्टजवळील चौकाला डॉ. शांती पटेल यांचे नाव



स्वातंत्र्यसैनिक, मुंबईचे माजी महापौर आणि ज्येष्ठ कामगार नेते डॉ. शांती पटेल यांचे नाव मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ऑरेंज गेटजवळील पी.डिमेलो रोड व मॅलेट बंदर रोड येथील चौकाला देण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव नुकताच महापालिका सभागृहात मंजूर करण्यात आला आहे.

डॉ.शांती पटेल यांचे नाव चौकाला देण्याची मागणी मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष ॲड एस.के शेट्ये व जनरल सेक्रेटरी सुधाकर अपराज यांनी महापालिकेकडे केली होती. काँग्रेस नगरसेविका निकिता निकम यांनी याबाबतचा प्रस्ताव सभागृहात मांडला होता. सॅण्डहर्स्ट रोड 'बी' विभागातील प्रभाक क्रमांक २२३ मधील पी.डिमेलो रस्ता व मॅलेट बंदर रस्ता, रेल्वे लोहमार्ग पोलिस आयुक्ता-लयाजवळ जेथे एकमेकांना छेदतात, तेथे तयार होणाऱ्या इंग्रजी 'टी' आकाराच्या चौकास हे नाव दिले जाणार आहे.



मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

# लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

लोकसत्ता संपादकीय

गुरुवार, ५ ऑगस्ट २०२१

## व्यक्तिवेध



सि. ना. आलुरे

**पोतराज निर्मूलन,** अनुसूचित जाती- जमातीमधील व्यक्तींना मंदिर प्रवेश, त्यांच्या हस्ते देवतांना अभिषेक व्हावा म्हणून झटणे... अशा उपक्रमांतून समतेचे मूल्य सामाजिक आणि राजकीय पातळीवर अबाधित राहावे या प्रयत्नांसह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सोयी निर्माण व्हाव्यात यासाठी अनेक वर्षे निष्ठेने काम करणारे सि. ना. आलुरे गेले. त्यांच्या नावानंतर गुरुजी असा शब्द उच्चारला गेला नाही तर त्यांची ओळख अपुरी वाटावी एवढा व्यावसायिक दबदबा त्यांनी त्यांच्या कामाने उभा केला. ग्रामीण भागात शिक्षणाचा दर्जा राखणाऱ्या, राष्ट्रीय संस्कार विकसित करणाऱ्या जवाहर विद्यालयातून अनेक विद्यार्थी त्यांनी घडविले. उस्मानाबाद जिल्ह्यातील आणि विशेषत: तुळजापूर तालुक्यातील विद्यार्थी डोक्यावर गांधी टोपी अक्षरश: मिरवितो. कारण या शाळांच्या गणवेशाचा टोपी हा अविभाज्य भाग होता. या टोपीमागचा विचार, शिकवण त्यांनी विद्यार्थ्यांपर्यंतही पोहोचवली. आलुरे यांनी तुळजापूर मतदारसंघात काँग्रेसचा झेंडा अनेक वर्षे फडकवत ठेवला. काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते अशी ओळख असणाऱ्या या कार्यकर्त्यावर साने गुरुजी, विनोबा भावे, पुढे नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांचा प्रभाव अधिक होता. त्यामुळे अनेक समाजसुधारणेची कामे त्यांनी केली. तुळजापूर तालुक्यात अनेक विद्यार्थी पोतराज होत. केस राखत. त्यांचे शिक्षण सुटून जाई. पण केस कापले की ही मुले सामान्यपणे जगू शकतात, शिकू शकतात असा विश्वास निर्माण करून देण्यासाठी आलुरे गुरुजींनी विशेष परिश्रम केले. दांडगा जनसंपर्क हे आलुरे गुरुजींचे वैशिष्ट्य. त्यामुळे अनेक वर्षे शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात असणारा तुळजापूर मतदारसंघ काँग्रेसकडे सरकला. १९८० च्या विधानसभा निवडणुकीत ते निवडून आले आणि त्यानंतर या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मधुकरराव चव्हाण यांचा विजय आलुरे गुरुजींच्या शब्दांशिवाय पूर्ण होणे शक्य नसे. एका बाजूला राज्यभरच्या सामाजिक कार्यकर्त्यांशी संपर्क, दुसरीकडे सहकारी संस्था नीट चालाव्यात म्हणून होणाऱ्या जाणीवपूर्वक प्रयत्नांना बळ देण्याचे काम त्यांनी केले. तुळजाभवानी सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीसह राज्य शिखर बँकेचे १५ वर्षे संचालक म्हणून काम करताना चुकीचे काही होऊ नये यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजही अनेकांच्या लक्षात आहेत. पांढरा शुभ्र सदरा, शुभ्र धोतर आणि टोपी या पेहरावात राहणाऱ्या आलुरे गुरुजी यांनी विनयशील स्वभावाचा संस्कार ते अध्यक्ष असणाऱ्या बालाघाट शिक्षण संस्थेत काम करणाऱ्यांपर्यंत रुजविला. त्यासाठी ते आग्रही राहिले. म्हणूनच त्यांचे निधन पोकळी निर्माण करणारे आहे.

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

लोकसत्ता संपादकीय

गुरुवार, ५ ऑगस्ट २०२१

## व्यक्तिवेध



सि. ना. आलुरे

**पोतराज निर्मूलन,** अनुसूचित जाती- जमातीमधील व्यक्तींना मंदिर प्रवेश, त्यांच्या हस्ते देवतांना अभिषेक व्हावा म्हणून झटणे... अशा उपक्रमांतून समतेचे मूल्य सामाजिक आणि राजकीय पातळीवर अबाधित राहावे या प्रयत्नांसह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सोयी निर्माण व्हाव्यात यासाठी अनेक वर्षे निष्ठेने काम करणारे सि. ना. आलुरे गेले. त्यांच्या नावानंतर गुरुजी असा शब्द उच्चारला गेला नाही तर त्यांची ओळख अपुरी वाटावी एवढा व्यावसायिक दबदबा त्यांनी त्यांच्या कामाने उभा केला. ग्रामीण भागात शिक्षणाचा दर्जा राखणाऱ्या, राष्ट्रीय संस्कार विकसित करणाऱ्या जवाहर विद्यालयातून अनेक विद्यार्थी त्यांनी घडविले. उस्मानाबाद जिल्ह्यातील आणि विशेषतः तुळजापूर तालुक्यातील विद्यार्थी डोक्यावर गांधी टोपी अक्षरशः मिरवितो. कारण या शाळांच्या गणवेशाचा टोपी हा अविभाज्य भाग होता. या टोपीमागचा विचार, शिकवण त्यांनी विद्यार्थ्यांपर्यंतही पोहोचवली. आलुरे यांनी तुळजापूर मतदारसंघात काँग्रेसचा झेंडा अनेक वर्षे फडकवत ठेवला. काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते अशी ओळख असणाऱ्या या कार्यकर्त्यांवर साने गुरुजी, विनोबा भावे, पुढे नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांचा प्रभाव अधिक होता. त्यामुळे अनेक समाजसुधारणेची कामे त्यांनी केली. तुळजापूर तालुक्यात अनेक विद्यार्थी पोतराज होत. केस राखत. त्यांचे शिक्षण सुटून जाई. पण केस कापले की ही मुले सामान्यपणे जगू शकतात, शिकू शकतात असा विश्वास निर्माण करून देण्यासाठी आलुरे गुरुजींनी विशेष परिश्रम केले. दांडगा जनसंपर्क हे आलुरे गुरुजींचे वैशिष्ट्य. त्यामुळे अनेक वर्षे शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात असणारा तुळजापूर मतदारसंघ काँग्रेसकडे सरकला. १९८० च्या विधानसभा निवडणुकीत ते निवडून आले आणि त्यानंतर या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मधुकरराव चव्हाण यांचा विजय आलुरे गुरुजींच्या शब्दांशिवाय पूर्ण होणे शक्य नसे. एका बाजूला राज्यभरच्या सामाजिक कार्यकर्त्यांशी संपर्क, दुसरीकडे सहकारी संस्था नीट चालाव्यात म्हणून होणाऱ्या जाणीवपूर्वक प्रयत्नांना बळ देण्याचे काम त्यांनी केले. तुळजाभवानी सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीसह राज्य शिखर बँकेचे १५ वर्षे संचालक म्हणून काम करताना चुकीचे काही होऊ नये यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजही अनेकांच्या लक्षात आहेत. पांढरा शुभ्र सदरा, शुभ्र धोतर आणि टोपी या पेहरावात राहणाऱ्या आलुरे गुरुजी यांनी विनयशील स्वभावाचा संस्कार ते अध्यक्ष असणाऱ्या बालाघाट शिक्षण संस्थेत काम करणाऱ्यांपर्यंत रुजविला. त्यासाठी ते आग्रही राहिले. म्हणूनच त्यांचे निधन पोकळी निर्माण करणारे आहे.

लोकमत

# जवाहर परिवाराची अणदुरात शोकसभा

## आलुरे गुरूजी यांना वाहिली श्रध्दांजली

लोकमत न्यूज नेटवर्क



**अणदूर :** येथील जवाहर परिवाराच्या वतीने जवाहर महाविद्यालयात शुक्रवारी शोकसभा घेऊन सि.ना. आलुरे गुरुजी यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवदास कांबळे तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य महादेवप्पा आलूरे, सरपंच रामचंद्र आलुरे, तुळजाभवानी कारखान्याचे माजी चेअरमन सिद्रामप्पा खराडे, ॲड. लक्ष्मीकांत पाटील, तुळजापूर पंचायत समितीचे उपसभापती उत्तमराव लोमटे, सेवानिवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी बोणे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, डॉ. अशोक चिंचोले, प्राचार्य सुरेश ठोंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश सोनटक्के यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रमोद येवले, आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, डी. ए. चोपडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. देवानंद शिंदे, डी. आर. माने, भाऊसाहेब गाजरे यांचे शोकसंदेशही वाचून दाखविण्यात आले. महाविद्यालयात प्रांगणात आलुरे गुरुजी यांचा पूर्णाकृती पुतळा उभा करणे, राज्य पातळीवरील प्रेरणास्थळ म्हणून स्मारक उभे करून त्यांनी आयुष्यभर वापरलेल्या वस्तूंचा संग्रह करणे व त्यांच्या नावाने ग्रंथालय, मार्गदर्शक केंद्र उभे करण्याचे निश्चित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चन्नशेट्टी, सूत्रसंचालन डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले. रामचंद्र आलुरे यांनी आभार मानले.

Hello Osmanabad
Page No. 4 Aug 08, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# जवाहर महाविद्यालय परिसरात वृक्ष लागवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर** : तुळजापूर तालुक्यातील जवाहर महाविद्यालय व प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने वनसंवर्धन सप्ताहानिमित्त महाविद्यालय परिसरात दोनशे वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच लागवड केलेले वृक्ष प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी यांनी दत्तक घेऊन संवर्धनाची जबाबदारी घेतली आहे.

यावेळी चन्नबसव सामाजिक संस्थेच्या ट्री बँकेच्यावतीने महाविद्यालयास अकरा वृक्ष भेट देऊन, जांभूळ आणि पेरुच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या वर्षभरामध्ये महाविद्यालयाच्या प्रांगणात एक हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प यावेळी प्राचार्य डॉ. उमाकांत चन्नशेट्टी यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास चन्नबसव सामाजिक संस्थेचे संस्थापक शिवशंकर तिरगुळे, डॉ. एम. एस. लंगडे, डॉ. डी. एस. सूर्यवंशी, डॉ. अंकुश कदम, डॉ. जी. टी. राठोड, डॉ. अनिता मुदकन्ना, सचिन तोग्गी, डॉ. दीपा कलशेट्टी, डॉ. एस. एम. बाड, डॉ. अमोल पाचपिंडे, प्रा. विवेकानंद वाहुळे, डॉ. एस. ए. सांगळे, डॉ. एस. व्ही. राजमाने, डॉ. चंद्रकांत जाधव, डॉ. विश्वास माने, प्रा. एस. डी. आगलावे, काशिनाथ करपे, नामदेव काळे, गणेश सर्जे, काकडे आदी उपस्थित होते.

Hello Osmanabad
Page No. 3 Jul 27, 2021
Powered by: erelego.com

लोकमत



अणदूर येथील जवाहर महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करताना प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, शिवशंकर तिरगुळे, डॉ. एम. एस. लंगडे, डॉ. डी.एस.सूर्यवंशी, डॉ. अंकुश कदम, डॉ. जी. टी. राठोड आदी उपस्थित होते.

Hello Osmanabad
Page No. 3 Jul 27, 2021
Powered by: erelego.com

# अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात मत्स्यसंवर्धन तलावाची निर्मिती

**शिव निर्णय**/ इटकळ : तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागांतर्गत मत्स्य संवर्धनासाठी व प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांच्या मत्स्य व्यवसाय अभ्यासक्रम आणि संशोधन वृत्तीला वाव देण्यासाठी महाविद्यालया लगत असलेल्या पानथळ जागेवर मत्स्यसंवर्धन शेततलाव निर्मिती करुन या मत्स्य संवर्धन शेततलावात मत्स्यबीज सोडण्यात आले.

महाविद्यालयात शिक्षण घेणार्या विद्यार्थी संशोधकांसाठी येथील पाणथळ जागेत पावसाच्या पाण्याचे जलपु:र्भरण करून या जलस्रोताआधारे निर्माण करण्यात आलेल्य या मत्स्यसंवर्धन शेतलावात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस एस.बाड, प्रा. डॉ. जी. टी. राठोड यांच्या हस्ते कटला,रोहिता, मिरंगला, कॉरपियो आदी प्रजातीचे मत्स्यबीज सोडण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक व या क्षेत्रात संशोधन करु इच्छिणाऱ्या संशोधका सह मत्स्य व्यवसायाचा एकात्मिक विकास करण्यासाठी व मत्स्य उत्पादनासाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या नीलक्रांती योजने अंतर्गत जलाशयाच्या क्षेत्रांमध्ये मत्स्यसंवर्धनातून शेतीपूरक व्यवसाय वृध्दीसाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार असून शेतकरी व मत्स्य व्यावसायिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी माहिती व प्रशिक्षणासाठी



हा पथदर्शी प्रकल्प म्हणून विकसित करणार असल्याचे मत प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी व्यक्त केले. यावेळी बामुक्टाचे अध्यक्ष डॉ.अंकुश कदम, प्रा. डॉ.एस.व्ही. माने, डॉ.अमोल पाचपिंडे, प्रा.डॉ.एस.व्ही. राजमाने, डॉ. विश्वास माने, डॉ.एम. बी. बिराजदार, माजी विद्यार्थी संघटनेचे भैरवनाथ कानडे, डॉ. डि.एस.सूर्यवंशी, काशिनाथ करपे, पी.आर. भुरे, गणेश सर्जे आदींची उपस्थिती होती.

# जवाहर महाविद्यालयात मत्स्यसंवर्धन तलावाची निर्मिती

**पुण्य नगरी** | वृत्तसेवा



**अणदूर:** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागांतर्गत मत्स्य संवर्धनासाठी व प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांच्या मत्स्य व्यवसाय अभ्यासक्रम आणि संशोधन वृत्तीला वाव देण्यासाठी महाविद्यालयालगत असलेल्या पानथळ जागेवर मत्स्यसंवर्धन शेततलाव निर्मिती करून या मत्स्यसंवर्धन शेततलावात मत्स्यबीज सोडण्यात आले.

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संशोधकांसाठी येथील पाणथळ जागेत पावसाच्या पाण्याचे जलपुर्णभरण करून या जलस्रोताआधारे निर्माण करण्यात आलेल्या या मत्स्यसंवर्धन शेततलावात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस एस. बाड, प्रा. डॉ. जी. टी. राठोड यांच्या हस्ते कटला, रोहिता, मिरंगला, कॉरपियो आदी प्रजातीचे मत्स्यबीज सोडण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक व या क्षेत्रात संशोधन करु इच्छिणाऱ्या संशोधकासह मत्स्यव्यवसायाचा एकात्मिक विकास करण्यासाठी व मत्स्य उत्पादनासाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या नीलक्रांती योजने अंतर्गत जलाशयाच्या क्षेत्रांमध्ये मत्स्यसंवर्धनातून शेतीपूरक व्यवसाय वृध्दीसाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार असून शेतकरी व मत्स्यव्यावसायिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी माहिती व प्रशिक्षणासाठी हा पथदर्शी प्रकल्प म्हणून विकसित करणार असल्याचे मत प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी व्यक्त केले. यावेळी बामुक्टाचे अध्यक्ष डॉ.अंकुश कदम ,प्रा. डॉ. एस .व्ही. माने, डॉ. अमोल पाचपिंडे, डॉ. विश्वास माने, डॉ. एस. व्ही. राजमाने, डॉ.एम. बी. बिराजदार , माजी विद्यार्थी संघटनेचे भैरवनाथ कानडे, डॉ .डि. एस .सूर्यवंशी, काशिनाथ करपे, पी.आर. भुरे, गणेश सर्जे आदींची उपस्थिती होती.

दैनिक
जनमत




# अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात मत्स्यसंवर्धन तलावाची निर्मिती

अणदूर दि.२४ (प्रतिनिधी)–तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागांतर्गत मत्स्य संवर्धनासाठी व प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांच्या मत्स्य व्यवसाय अभ्यासक्रम आणि संशोधन वृत्तीला वाव देण्यासाठी महाविद्यालया लगत असलेल्या पानथळ जागेवर मत्स्यसंवर्धन शेततलाव निर्मिती करुन या मत्स्य संवर्धन शेततलावात मत्स्यबीज सोडण्यात आले.

महाविद्यालयात शिक्षण घेणार्या विद्यार्थी संशोधकांसाठी येथील पाणथळ जागेत पावसाच्या पाण्याचे जलपु: र्भरण करून या जलस्रोताआधारे निर्माण करण्यात आलेल्य या मत्स्यसंवर्धन शेततलावात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस एस.बाड, प्रा. डॉ. जी. टी. राठोड यांच्या हस्ते कटला, रोहिता, मिरंगला, कॉरपियो आदी प्रजातीचे मत्स्यबीज सोडण्यात आले.

महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक व या क्षेत्रात संशोधन करु इच्छिणाऱ्या संशोधका सह मत्स्य व्यवसायाचा एकात्मिक विकास करण्यासाठी व मत्स्य उत्पादनासाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या नीलक्रांती योजने अंतर्गत जलाशयाच्या क्षेत्रांमध्ये मत्स्यसंवर्धनातून शेतीपूरक व्यवसाय वृध्दीसाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार असून शेतकरी व मत्स्य व्यावसायिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी माहिती व प्रशिक्षणासाठी हा पथदर्शी प्रकल्प म्हणून विकसित करणार असल्याचे मत प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी व्यक्त केले. यावेळी बामुक्टाचे अध्यक्ष डॉ.अंकुश कदम ,प्रा. डॉ. एस .व्ही. माने, डॉ. अमोल पाचपिंडे, प्रा.डॉ. एस.व्ही. राजमाने, डॉ. विश्वास माने, डॉ.एम. बी. बिराजदार , माजी विद्यार्थी संघटनेचे भैरवनाथ कानडे, डॉ .डि. एस .सूर्यवंशी, काशिनाथ करपे , पी.आर. भुरे, गणेश सर्जे आदींची उपस्थिती होती.

महत्त्वाचे



# जवाहर महाविद्यालयात मत्स्यसंवर्धन तलावाची निर्मिती

**अणदूर :** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागांतर्गत मत्स्य संवर्धनासाठी व प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांच्या मत्स्य व्यवसाय अभ्यासक्रम आणि संशोधन वृत्तीला वाव देण्यासाठी महाविद्यालयालगत असलेल्या पानथळ जागेवर मत्स्यसंवर्धन शेततलाव निर्मिती करुन या मत्स्यसंवर्धन शेततलावात मत्स्यबीज सोडण्यात आले. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संशोधकांसाठी येथील पाणथळ जागेत पावसाच्या पाण्याचे जलपु:र्भरण करून या जलस्रोताआधारे निर्माण करण्यात आलेल्य या मत्स्यसंवर्धन शेततलावात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस एस. बाड, प्रा. डॉ. जी. टी. राठोड यांच्या हस्ते कटला, रोहिता, मिरंगला, कॉरपियो आदी प्रजातीचे मत्स्यबीज सोडण्यात आले. मत्स्यसंवर्धनातून शेतीपूरक व्यवसाय वृध्दीसाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार असून शेतकरी व मत्स्यव्यावसायिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी माहिती व प्रशिक्षणासाठी हा पथदर्शी प्रकल्प म्हणून विकसित करणार असल्याचे मत प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी व्यक्त केले. यावेळी बामुक्टाचे अध्यक्ष डॉ.अंकुश कदम, प्रा. डॉ. एस. व्ही. माने, डॉ. अमोल पाचपिंडे, डॉ.एम. बी. बिराजदार, माजी विद्यार्थी संघटनेचे भैरवनाथ कानडे, डॉ. डी. एस. सुर्यवंशी, काशिनाथ करपे, पी.आर. भुरे, गणेश सर्जे आदींची उपस्थिती होती.

लोकमत



# अणदुरात माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना

**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना करण्यात येऊन संघटनेतील नूतन पदाधिकाऱ्यांची बैठक प्राचार्य तथा संघटनेचे अध्यक्ष प्रा. डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. कार्यकारिणीमध्ये रेवणसिद्ध आंधळकर (कार्याध्यक्ष), प्रा. संतोष नरे (उपाध्यक्ष), डॉ. विश्वास माने (सचिव), प्रा. ज्योती हत्तरगे (कोषाध्यक्ष), शैलजा बिरादार, लक्ष्मी पाटील, विक्रम आलुरे, सोनाली जाधव, सुभाष गळाकाटे, डॉ. रामकृष्ण कदम, सुषमा बिराजदार, गोविंद घंटे (सर्व संचालक), भैरवनाथ कानडे (संपादक), प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार (समन्वयक) आदींचा समावेश आहे. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे आभार मानले.

Hello Osmanabad
Page No. 3 Jul 18, 2021
Powered by: erelego.com

SMART उस्मानाबाद | शुक्रवार,१६ जुलै २०२१

# जवाहर महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना

पुण्य नगरी। वृत्तसेवा

**अणदूर:** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर कला ,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संघटनेचे अध्यक्ष प्रा. उमाकांत चनशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेची बैठक घेण्यात आली.

यावेळी बोलताना ते म्हणाले, महाविद्यालयातून शिक्षण घेऊन गेलेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी कायम संपर्क करावा व त्यांच्या ज्ञानाचा, पदाचा व अनुभवाचा वर्तमान विद्यार्थ्यांना लाभ व्हावा याकरिता माजी विद्यार्थी संघटना स्थापन करण्यात आली आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम



राबविण्यात येणार आहेत. यावेळी संघटनेची कार्यकारिणीही जाहीर करण्यात आली. यात कार्याध्यक्ष रेवणसिद्ध आंधळकर , उपाध्यक्ष प्रा. संतोष नरे, सचिव डॉ. विश्वास माने ,कोषाध्यक्ष प्रा. ज्योती हत्तरगे, संचालक शैलजा बिरादार, लक्ष्मी पाटील, विक्रम आलुरे, सोनाली जाधव, सुभाष गळाकाटे, डॉ. रामकृष्ण कदम, सुषमा बिराजदार, गोविंद घंटे, संपादक भैरवनाथ कानडे तर समन्वयकपदी डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी प्रा. नरे ,श्री. आंधळकर, डॉ. माने, श्री.कानडे , बिराजदार यांनीही विचार व्यक्त केले.

# जवाहर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन

**तभा वृत्तसेवा**

**अणदूर, दि. २१ जून -** जवाहर माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयाच्या वतीने सातव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयाच्या प्रांगणात ऑफलाइन आणि ऑनलाईन दोन्ही माध्यमातून योगासन, प्राणायाम व ध्यान घेऊन योग दिन साजरा करण्यात आला. योग दिनाची सुरुवात सकाळी सात वाजता अणदूरचे प्रथम नागरिक सरपंचरामचंद्र आलुरे यांच्या हस्ते तपोरत्नं कुमारस्वामी व आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजनाने उद्घाटन संपन्न झाले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सुरेश ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. योगासन, प्राणायाम व ध्यानाचे प्रात्यक्षिक प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे व प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांच्या समन्वयातून हळू हळू चालण्यापासून ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, पद्मासन, कटिचक्रासन, पर्वतासन, योगमुद्रा, अर्धमत्स्येंद्रासन, वज्रासन, मण्डुकासन, शिशुआसन, शलभासन, भुजंगासन, धनुरासन, नौकासन, पवनमुक्तासन, सर्वांगासन, हलासन, सेतूबंधासन, मयुरासन, शीर्षासन, अनुलोम-विलोम, भ्रामरी, भस्त्रिका, सूर्यनमस्कार, आनंद रेड्डी प्राणायाम व शेवटी रामध्यान घेण्यात आले.

पुण्य नगरी

# जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा

**■ शाळा, महाविद्यालयाच्या वतीने ऑनलाईन कार्यक्रम ■ प्राणायाम, योगासनाबद्दल प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन**





**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**उस्मानाबाद:** जिल्ह्यात सातवा आंतरराष्ट्रीय योग दिन सोमवारी (दि.२१ )उत्साहात साजरा करण्यात आला. कोरोनाच्या संकटामुळे योग दिनानिमित्त मोजकेच कार्यक्रम घेण्यात आले. सोशल डिस्टन्सींगसह अन्य नियमांचे पालन करण्यात आले. शाळा, महाविद्यालयाच्या वतीने योगाचा ऑनलाईन कार्यक्रम घेण्यात आला.

शहरातील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात योग व प्राणायामचा ऑनलाईन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी लक्ष्मीकांत जहागीरदार यांनी योग व प्राणायामचे महत्व सांगून प्रशिक्षण दिले. कार्यक्रमास अॅड. मिलिंद पाटील, शेषाद्री डांगे, कमलाकर पाटील , प्राचार्य प्रशांत चौधरी, डॉ. मकरंद चौधरी यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पोदार इंटरनॅशनल स्कूल,उस्मानाबाद

उस्मानाबाद येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये योगदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिकासह योगासनाबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. प्रारंभी प्राचार्य आनंदकुमार शहा यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी दिपक अंकुश, दिपक इगवे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्व पटवून दिले.कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी स्वप्नील जुमडे, पोदार जम्बो किड्सच्या मुख्याध्यापिका शिला टाक यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थी ऑनलाईन या कार्यक्रमास उपस्थित होते. डॉ.विवेक महाजन यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भक्ती पाटील, आकाश उबाळे तर आभार प्रभाकर चौधरी यांनी केले.

## जगदाळे महाविद्यालय, वाशी

**वाशी :** शहरातील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयामध्ये योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. रविंद्र कठारे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन कार्यक्रम घेवून योग दिनाचे महत्व विषद करण्यात आले. कोरोना माहामारीमध्ये स्वतःला निरोगी कसे ठेऊ शकतो त्याबद्दल योग प्रत्याक्षिके सादर करून मागदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.अरुण गंभीरे, सुत्रसंचालन डॉ. आनंद करडे तर आभार प्रा.रवि चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने ऑनलाईन झूम अॅपच्या माध्यमातून उपस्थित होते.

## जवाहर महाविद्यालय,अणदूर

**अणदुर:** तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील जवाहर महाविद्यालयाच्या वतीने ऑफलाइन आणि ऑनलाईन पध्दतीने योगासन, प्राणायामचा कार्यक्रम घेण्यात आला. सरपंच रामचंद्र आलुरे यांच्या हस्ते तपोरत्न कुमार स्वामी व आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री श्री रविशंकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कोरोना रुपी जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी योगासन आणि प्राणायाम अत्यंत महत्त्वाचे आहे. योगासनामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढविल्यास आपण कोरोनासारख्या संकटाचा सामना करू शकतो, असे मत श्री. आलुरे यांनी व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, डॉ. सूर्यकांत आगलावे, डॉ. मल्लिनाथ बिराजदार, डॉ. सुरेखा भारती, क्रिडाशिक्षक ठाक्करु राठोड , जयहिंद पवार , संतोष चोधरी, प्रदीप कदम यांच्यासह प्राध्यापकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

## तुळजापूर येथे साजरा

**तुळजापूर:** जवाहर नवोदय विद्यालयात योगदिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य के. वाय. इंगळे यांनी योगाचे महत्त्व विषद केले. कार्यक्रमास उपप्राचार्य एस. व्ही. स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रीडा शिक्षक आर .एम. अलसेट, एस. आर. अलसेट यांनी भुजंगासन ,वक्रासन ,प्राणायाम, शवासन ,पद्मासन, त्रिकोणासन, वृक्षासन ,धनुरासन, ताडासनाचे प्रात्याक्षिक दाखवले. तसेच योगासनाचे फायदेही सांगितले. शेवटी एस. जी. भोरगे यांनी आभार मानले. भाजपाच्या वतीने आर्ट ऑफ लिव्हिंगच्या योग कार्यशाळेत योगदिन साजरा करण्यात आला. यावेळी तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, आनंद कंदले, गुलचंद व्यवहारे, नागेश नाईक, गिरीष देवलाकर, रामचंद्र गिड्डे, हणमंत गपाट, अविनाश धट, राम चोपदार, विशाल टोले, अनिल आगलावे, बालाजी बाशेवाड, श्री.पवार, सागर पारडे, योग प्रशिक्षक राजेश देशमुख आदींची उपस्थिती होती. यावेळी प्राणायाम, मंडुकासन ,उष्ठासन,मकरासन,शलभासन,भुजंगासनाचे प्रात्याक्षिक सादर करून मार्गदर्शन करण्यात आले.

## कळंब येथे योग शिबिरास प्रतिसाद



**कळंब :** पतंजली योग समिती व रोटरी क्लबच्या वतीने ऑनालाईन योग शिबीर घेण्यात आले. कार्यक्रमास रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ.गिरीष कुलकर्णी, सचिव डॉ.सचिन पवार, संजय देवडा, विश्वजित ठोंबरे, अमोल लोढा, करसन पटेल, पंडित दशरथ, किशोर मोरे, अरविंद शिंदे, पतंजली योग समितीचे महामंत्री श्री. हुंडेकरी, महिला समितीच्या अर्चना भातलवंडे उपस्थित होते.यावेळी योगशिक्षक शशिकुमार भातलवंडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच योगासन व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर करून त्याचे महत्व विषद केले. निरोगी आयुष्यासाठी योग प्राणायाम याला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनविणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. या शिबिरात नॅचरल शुगर्सचे संस्थापक बी. बी. ठोंबरे व इतर क्षेत्रातील मान्यवरांसह जवळपास ९० साधक उपस्थित होते.

# जवाहर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन संपन्न




**शिव निर्णय** / अणदूर – जवाहर माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयाच्या वतीने सातव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयाच्या प्रांगणात ऑफलाइन आणि ऑनलाईन दोन्ही माध्यमातून योगासन, प्राणायाम व ध्यान घेऊन योग दिन साजरा करण्यात आला. योग दिनाची सुरुवात सकाळी सात वाजता अणदूरचे प्रथम नागरिक सरपंच रामचंद्र आलुरे यांच्या हस्ते तपोरत्नं कुमारस्वामी व आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्रीरविशंकर गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजनाने उद्घाटन संपन्न झाले. याप्रसंगी बोलताना रामचंद्र आलुरे म्हणाले की कोरोना रुपी जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी योगासन आणि प्राणायाम अत्यंत महत्त्वाचे आहे. निसर्गाने आपल्याला भरभरून ऑक्सिजन दिलेला आहे. त्याची किंमत आपल्याला वाटत नाही. योग्य वेळी श्वासाच्या माध्यमातून ऑक्सिजन शरीरात साठवून रोगप्रतिकारक शक्ती वाढविल्यास आपण येणाऱ्या संकटाशी सामना करू शकतो. म्हणून योगासने व प्राणायामचे धडे घेऊन आपण शरीर आणि मन सदृढ करूया. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

योगासन, प्राणायाम व ध्यानाचे प्रात्यक्षिक प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे व प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांच्या समन्वयातून हळू हळू चालण्यापासून ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, पद्मासन, कटिचक्रासन, पर्वतासन, योगमुद्रा, अर्धमत्स्येंद्रासन, वज्रासन, मण्डुकासन, शिशुआसन, शलभासन, भुजंगासन, धनुरासन, नौकासन, पवनमुक्तासन, सर्वांगासन, हलासन, सेतूबंधासन, मयुरासन, शीर्षासन, अनुलोम-विलोम, भ्रामरी, भस्त्रिका, सूर्यनमस्कार, आनंद रेड्डी प्राणायाम व शेवटी रामध्यान घेण्यात आले.

या योगासन, प्राणायाम व ध्यानाच्या माध्यमातून शरीरात उर्जा संचारली. थोड्यावेळासाठी मानसिक शांती व शारीरिक समाधान लाभल्याचे निदर्शनास आले. दररोज अर्धा तास आपण यासाठी वेळ दिला तर निश्चितच आपण अनेक आजारावर मात करू शकतो याची जाणीव शिबिरार्थींना झाली.या कार्यक्रमास जवाहर विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय व महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, एन सी सी व एन एस एस च्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व ऑफलाईन च्या माध्यमातून मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेतला.

या कार्यक्रमाची सांगता प्रा. डॉ. श्रीमती सुरेखा भारती यांच्या शांतीपाठाने झाली. योगेश खराडे यांनी सुंदर प्रक्षेपण केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी क्रिडाशिक्षक राठोड व पवार व संतोष चोधरी यांचे सहकार्य लाभले. प्रदीप कदम यांनी आभार मानले.

दैनिक जागृत

Email:jagrutjanpravas@gmail.com

जनप्रवास

संपादक : धनंजय दिनकरराव पाटील, मो.नं. 9404380811 JAGRUT JANPRAVAS

# अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात संपन्न

**इटकळ** – अणदूर येथे सोमवार दि. २१ जून २०२१ रोजी जवाहर माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालया च्या वतीने सातव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालया च्या प्रांगणात ऑफलाइन आणि ऑनलाईन दोन्ही माध्यमातून योगासन, प्राणायाम व ध्यान घेऊन योग दिन साजरा करण्यात आला. योग दिनाची सुरुवात सकाळी सात वाजता अणदूरचे प्रथम नागरिक सरपंच श्री.रामचंद्र आलुरे यांच्या हस्ते तपोरत्नं कुमारस्वामी व आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजनाने उद्घाटन संपन्न झाले.

याप्रसंगी बोलताना रामचंद्र आलुरे म्हणाले की कोरोना रुपी जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी योगासन आणि प्राणायाम अत्यंत महत्त्वाचे आहे. निसर्गाने आपल्याला भरभरून ऑक्सिजन दिलेला आहे. त्याची किंमत आपल्याला वाटत नाही. योग्य वेळी श्वासाच्या माध्यमातून ऑक्सिजन शरीरात साठवून रोग प्रतिकारक शक्ती वाढविल्यास आपण येणाऱ्या संकटाशी सामना करू शकतो. म्हणून योगासने व प्राणायाम चे धडे घेऊन आपण शरीर आणि मन सदृढ करूया.या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सुरेश ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. योगासन, प्राणायाम व ध्यानाचे प्रात्यक्षिक प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे व प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांच्या समन्वयातून हळू हळू चालण्यापासून ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, पद्मासन, कटिचक्रासन, पर्वतासन, योगमुद्रा, अर्धमत्स्येंद्रासन, वज्रासन, मण्डुकासन, शिशुआसन, शलभासन, भुजंगासन, धनुरासन, नौकासन, पवनमुक्तासन, सर्वांगासन, हलासन, सेतूबंधासन, मयुरासन, शीर्षासन, अनुलोम-विलोम, भ्रामरी, भस्त्रिका, सूर्यनमस्कार, आनंद रेड्डी प्राणायाम व शेवटी रामध्यान घेण्यात आले.या योगासन, प्राणायाम व ध्यानाच्या माध्यमातून शरीरात उर्जा संचारली.






थोड्यावेळासाठी मानसिक शांती व शारीरिक समाधान लाभल्याचे निदर्शनास आले. दररोज अर्धा तास आपण यासाठी वेळ दिला तर निश्चितच आपण अनेक आजारावर मात करू शकतो याची जाणीव शिबिरार्थींना झाली.या कार्यक्रमास जवाहर विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय व महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, एन सी सी व एन एस एस च्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व ऑफलाईन च्या माध्यमातून मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेतला. या कार्यक्रमाची सांगता प्रा. डॉ. श्रीमती सुरेखा भारती यांच्या शांतीपाठाने झाली. श्री योगेश खराडे यांनी सुंदर प्रक्षेपण केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी क्रिडाशिक्षक राठोड सर व पवार सर व संतोष चोधरी यांचे सहकार्य लाभले. श्री प्रदीप कदम सर यांनी आभार मानले.

दिनेश सलगरे पत्रकार इटकळ

देशोन्नती
वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

# अणदुरच्या जवाहर महाविद्यालयात ऑनलाईन प्राणायाम व ध्यान शिबिर

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नळदुर्ग** ▪ महाविद्यालयीन युवकांच्या शारीरीक व मानसिक सशक्तीकरणासाठी व त्यांच्यात प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी ११ जून ते १५ जून या पाच दिवसांच्या कालावधीत आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार उस्मानाबाद व जवाहर महाविद्यालय अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच बालाघाट शिक्षण संस्था नळदुर्ग, भानुदासराव चव्हाण महाविद्यालय, लोहारा व शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय, लोहारा यांच्या सहयोगाने ऑनलाईन प्राणायाम व ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन ११ जून जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बोलताना प्राचार्य म्हणाले की, मन, मेंदू आणि मनगट बळकट करण्यासाठी व

## युवकांच्या मानसिक सशक्तरकरणासाठी
## विविध मान्यवरांनी केले मार्गदर्शन



महाविद्यालयीन युवकांना योग्य दिशा देण्यासाठी प्राणायाम आणि ध्यान अत्यंत महत्त्वाचे आहे. या प्रसंगी प्राचार्य डॉ. वीरभद्र स्वामी, प्राचार्य डॉ. संजय कोरेकर, प्राचार्य डॉ. विनायक पाटील, प्रा. डॉ. विश्वास माने, प्रा. डॉ. संतोष पवार, प्रा. डॉ. सुभाष राठोड, प्रा. डॉ.मनोज झाडे, प्रा. डॉ. उध्दव भाले, प्रा. डॉ. जी. टी.राठोड, मुख्याध्यापक लक्ष्मण नरे, आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार, उस्मानाबादचे मार्गदर्शक शशीकांत कदम, शिवगिरी, प्रशांत कुडाळ, प्रशांत संकपाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

या पाच दिवसाच्या शिबिरासाठी ट्रेनर म्हणून प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे, प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार, विकास होनराव, शरणाप्पा कुंभार यांनी काम पाहिले व प्रात्यक्षिक करून दाखविले. नीलकंठ कदम, मेघना शिंदे यांचे सहकार्य लाभले. १५ जून रोजी या शिबिराचा समारोप संपन्न झाला. सोपान सुरवसे व प्राध्यापकांनी अनुभव व्यक्त केले. जवाहर महाविद्यालयाचे आय क्यू ए सी चे समन्वयक प्रा. डॉ. विश्वास माने यांनी आभार मानले.

या पाच दिवसाच्या ऑनलाइन प्राणायाम व ध्यान शिबिरात सकाळी ७ ते ७:४० या वेळेत महाविद्यालयीन युवकांचे कोरोनाच्या काळात शारीरिक व मानसिक आरोग्य सशक्त करण्यासाठी शरीरासाठी योगासन श्वसनाचे प्राणायम व मनःशांतीसाठी ध्यान घेण्यात आले. या पाच दिवसांच्या शिबिरात महाविद्यालयीन युवक-युवती प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होऊन शिबिर यशस्वी करण्यात आले.

पुढारी

# एक दिवसीय लघुउद्योग कार्यशाळा

**अणदूर, पुढारी वृत्तसेवा :** अणदूर येथील हुतात्मा स्मारकात लोकमाता कै.लक्ष्मीबाई नागप्पा आलुरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त जवाहर महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व स्व. सौ.शांताकाकी आलुरे महिला सक्षमीकरण केंद्र यांच्यावतीने एकदिवसीय लघुउद्योग व स्वयंरोजगार निर्मिती कार्यशाळा झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन सरपंच रामचंद्र आलुरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी हे होते. प्रमुख मार्गदर्शक लातूर येथील वाटाड्या संस्थेचे प्रा डॉ विकास कुलकर्णी, मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, पोलिस निरीक्षक शेख, श्रीमती कुलकर्णी, डॉ मीना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

युवकांनी छोटे-छोटे उद्योग करून उद्योजक व स्वावलंबी व्हावे यासाठी अणदूर येथे एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.यावेळी बाजारपेठेतील विविध वस्तू विक्रीमधील चढ उतार व फरक सांगण्यात आला.



**अणदूर : लघुउद्योग व स्वयंरोजगार निर्मिती कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. विकास कुलकर्णी यावेळी व्यासपीठावर सरपंच रामचंद्र आलुरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी आदी.**

यावेळी मान्यवरांच्या हस्ते जवाहर पोलिस प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. वैशाली घुगे, नीता पाटील, मीरा घुगे, इंदुमती भोरे, शशिकला पाटील, स्नेहलता सुरवसे या उद्योगशील महिलांना सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी डॉ. विकास कुलकर्णी यांनी उद्योगासंबंधी मार्गदर्शन केले तर सरपंच रामचंद्र आलुरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, प्रा. विवेकानंद वाहुळे यांची भाषणे झाली.

प्रास्ताविक डॉ.अनिता मुदकण्णा-लंगडे, सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी सूर्यकांत आगलावे यांनी केले.

My Latur Edition
Dec 17, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in